मासिक अंक
(खाजगी वितरण)

# महाआयटी संवाद

सातवा अंक - सप्टेंबर 2026

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE



# महाDBT 2.0

## संधी आणि सक्षमीकरणाचे डिजिटल प्रवेशद्वार

सुलभ सेवा। अधिक पारदर्शकता। सक्षम नागरिक

**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# या अंकात...

**संपादकीय** 1
तंत्रज्ञान नागरिकांच्या सेवेसी...

**मुखपृष्ठ कथा** 2
महाडीबीटी 2.0 : संधी आणि सक्षमीकरणाचे नवे डिजिटल प्रवेशद्वार...

**विशेष अहवाल: अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतन (एमबीयू)** 6
बालकांची डिजिटल ओळख भविष्यासाठी सज्ज करण्यासाठी महाराष्ट्राचे अभियान

**सायबर सुरक्षा** 10
एआय आणि क्वांटम युगासाठी शासकीय नेतृत्वाची सज्जता

**शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोच** 13
पारनेर तालुक्यातील आपले सरकार सेवा केंद्र घडवते आहे नागरिक सेवांमध्ये परिवर्तन

**विश्वासापासून परिवर्तनापर्यंत** 14
पाथर्डी तालुक्यात डिजिटल सक्षमीकरणाचा आणि विश्वासार्ह प्रशासनाचा प्रवास

**आपले सरकार सेवा केंद्रांचे ब्रँडिंग** 15
प्रमाणित, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख सेवा जाळ्याच्या स्वरुपात आपले सरकार सेवा केंद्रांची फेररचना

**कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक जागरूकता प्रशिक्षण कार्यक्रम** 18
कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास महाराष्ट्रातील शासकीय कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन

**जिद्दीला मिळाले डिजिटल बळ आणि आयुष्याला, नवी दिशा!** 21
सचिन गोताड यांचे रत्नागिरीतील आपले सरकार सेवा केंद्र ठरले आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची नवी वाट

**महाआयटी–ग्राम वाणी भागीदारी : डिजिटल प्रशासनातील मानवी दुवा अधिक सक्षम करण्यासाठी नवा उपक्रम** 24
नागरिकांशी संवाद, समुदाय सहभाग आणि डिजिटल प्रशासनातील व्हीएलईंची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी प्रायोगिक उपक्रम



# संपादकीय


## भगवान पाटील

मुख्य परिचालन अधिकारी, महाआयटी


## तंत्रज्ञान नागरिकांच्या सेवेसी...

प्रशासनाने सेवा प्रदान करण्यासाठी नागरिकांना वेळोवेळी उपलब्ध करून दिलेले अभिनव मंच, डिजिटल सेवा आणि त्या कामी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानावरून राज्यातील डिजिटल परिवर्तनाच्या यशाचे मोजमाप केले जाते. मात्र अशा डिजिटल प्रशासनाने, आणि त्याचा आधार असलेल्या तंत्रज्ञानाने नागरिकांचे जीवन सोपे केले आहे का, या प्रश्नाचे होकारार्थी उत्तरच या यशाची खातरजमा करू शकते.

महाआयटी संवाद'च्या या अंकात, महाराष्ट्राच्या अधिक संलग्न, समावेशक आणि नागरिकाभिमुख डिजिटल भविष्याच्या दिशेने सुरु असलेल्या प्रवासाचे प्रतिबिंब दिसून येते. या प्रवासात महाडीबीटी 2.0, बालकांसाठी आधार-आधारित अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतन, कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित क्षमता उभारणी आणि सक्षम सायबर सुरक्षा सज्जता असे तंत्रज्ञानाधारित उपयुक्त प्रकल्प सार्वजनिक सक्षमीकरणाचे साधन ठरत आहेत.

एकात्मिक आणि पारदर्शक कल्याणकारी-वितरण प्रणाली असणारा महाडीबीटी 2.0 हा प्रकल्प या दृष्टीने महत्वाचा ठरतो. सर्व शासकीय योजना एकाच डिजिटल मंचावर उपलब्ध करून देणारा, आणि शासकीय लाभ प्राप्तीचा नागरिकांचा प्रवास सुलभ करणारा हा उपक्रम अतिशय प्रभावी ठरतो आहे. नागरिक ज्या शासकीय लाभांसाठी पात्र आहेत, ते मिळवण्यासाठी त्यांना शासकीय यंत्रणेच्या गुंतागुंतीचा त्रास होऊ नये, याची पुरेपूर खबरदारी घेणारा हा उपक्रम आहे.

केवळ तंत्रज्ञानाच्या जोरावर डिजिटल परिवर्तन यशस्वी होऊ शकत नाही, त्यासाठी मानवी संवाद सुद्धा महत्त्वाचा आहे, हे राज्यातील दुर्गम भागांमध्ये कार्यरत 'आपले सरकार सेवा केंद्रां'च्या अनुभवांवरून लक्षात येते., समर्पित भावनेने काम करणारे या केंद्रांचे परिचालक संपूर्ण राज्यभरातील विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुर्बळ घटकांना वैयक्तिक मार्गदर्शन करत शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी मदत करत आहेत.

शासकीय सेवा अधिकाधिक सक्रिय झाल्या पाहिजेत, आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, हे अधोरेखित करणारी 'अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतन' मोहीमसुद्धा या दृष्टीने उपयुक्त ठरते आहे. या मोहिमेअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेतच बायोमेट्रिक अद्यतनाची सुविधा उपलब्ध होते आहे, परिणामी नागरिक आणि सार्वजनिक सेवांमधील अंतर कमी होत असून पुढची पिढी डिजिटल भविष्यासाठी सज्ज होते आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशासनाचे स्वरूप बदलत असताना महाआयटी तांत्रिक परिवर्तनाच्या सर्वात महत्त्वाच्या घटकामध्ये, अर्थात लोकांमध्ये गुंतवणूक करते आहे, एआय जागरूकता प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून शासकीय कर्मचाऱ्यांना एआय आणि जनरेटिव्ह एआयची क्षमता समजून घेण्यास मदत करत आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाचा दैनंदिन कामकाजात वापर करण्यास त्यांना प्रोत्साहित करते आहे.

डिजिटल प्रगती करत असताना विश्वास जपणे सुद्धा आवश्यक आहे. जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी राज्याची डिजिटल परिसंस्था सायबर सुरक्षा आणि गोपनीयता जपणारी असावी, तसेच संभाव्य आव्हानांसाठी सज्ज असावी, याची खातरजमा सुद्धा या प्रकल्पांच्या अंमलबजावणीदरम्यान करण्यात आली आहे.

तंत्रज्ञानाने नागरिकांचे जगणे सुलभ केले पाहिजे, असा मूलभूत संदेश देणारा हा अंक आहे. राज्यभरात तंत्रज्ञानाचा स्वीकार वाढवताना महाआयटीची भूमिका केवळ डिजिटल मंच तयार करण्यापुरती मर्यादित नाही. ती अशा एका शासनाचा पाया उभारण्याबद्दल आहे, जे अधिक सोपे, वेगवान, सुरक्षित, अधिक पारदर्शक आणि अधिक प्रतिसादक्षम असेल.
तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे किती नागरिकांचे जगणे सुलभ आणि सुकर झाले, यावर महाराष्ट्राच्या डिजिटल भविष्याच्या वाटचालीचे यश ठरेल, आणि ते यश उल्लेखनीय असावे, यासाठी महाआयटीचे प्रकल्प मोलाचे योगदान देत आहेत.

# मुखपृष्ठ कथा



## महाडीबीटी 2.0 : संधी आणि सक्षमीकरणाचे नवे डिजिटल प्रवेशद्वार...

**थेट लाभ हस्तांतरणापासून डिजिटल सक्षमीकरण: महाराष्ट्राची एकात्मिक, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख कल्याणकारी व्यवस्था**

भारताच्या स्वातंत्र्य दिनी महाराष्ट्राने स्वातंत्र्याच्या आणखी एका नव्या स्वरूपावर भर दिला. नागरिकांना आवश्यक शासकीय सेवासुविधा प्राप्त करण्यातील अडथळे, शासकीय कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या आणि शासकीय लाभ मिळण्यातील विलंबापासून मुक्ती करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले.

15 ऑगस्ट 2026 रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाडीबीटी 2.0 अंतर्गत 29 नवीन योजनांचा शुभारंभ करण्यात आला. या विस्तारामुळे शिक्षण व शिष्यवृत्तीपासून कृषी आणि संबंधित उपजीविका क्षेत्रांपर्यंत विविध प्रकारचे शासकीय सहाय्य एकाच डिजिटल मंचावर उपलब्ध झाले आहे.

हा शुभारंभ केवळ तंत्रज्ञानातील सुधारणा नाही तर कल्याणकारी योजनांच्या लाभ वितरणाच्या पद्धतीत झालेला हा महत्त्वपूर्ण बदल आहे. विविध विभागांच्या स्वतंत्र प्रक्रियांपासून एकात्मिक नागरिक इंटरफेसकडे, कागदपत्रांपासून डेटाकडे, अनिश्चिततेपासून अर्जाच्या स्थितीच्या मागोव्याकडे आणि विखुरलेल्या वितरण व्यवस्थेपासून डिजिटलरीत्या जोडलेल्या कल्याणकारी परिसंस्थेकडे ही वाटचाल आहे. नागरिकांसाठी सरकारी सेवा अधिक सोप्या, जलद, पारदर्शक आणि अधिकाधिक डेटाआधारित करण्याच्या महाराष्ट्राच्या व्यापक प्रयत्नांचा हा एक महत्वाचा भाग आहे.

### महाराष्ट्राच्या डिजिटल प्रशासकीय प्रवासातील नवे पर्व

शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणे कठीण असणे, अनुदानाच्या अर्जाची स्थिती न कळणे किंवा आर्थिक मदतीसाठी वारंवार शासकीय कार्यालयांना भेटी द्याव्या लागणे यामुळे योजना चांगली असली तरी तिचा लाभ नागरिकांना मिळण्यात अडचणी येतात. धोरण चांगले असले तरी अशा योजना नागरिकांपासून दूर राहू शकतात.

थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून शेवटच्या टप्प्यातील ही अडचण दूर करण्यासाठी महाडीबीटीची निर्मिती करण्यात आली. महाडीबीटी



2.0 ने ही संकल्पना आणखी पुढे नेत पात्र योजना शोधण्यापासून अर्ज, प्रमाणीकरण, पडताळणी, अर्जाचा मागोवा आणि मंजूर लाभाच्या हस्तांतरणापर्यंतची संपूर्ण लाभ वितरण प्रक्रिया डिजिटल करण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रात उदयास येत असलेल्या व्यापक प्रशासन तत्त्वज्ञानाचेही या व्यासपीठाच्या उत्क्रांतीत प्रतिबिंब दिसते. तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ विद्यमान प्रक्रियेचे डिजिटल रूपांतर करण्यासाठी न करता, प्रक्रिया अधिक सोपी करण्यासाठी केला पाहिजे. महाडीबीटी 2.0 च्या यापूर्वीच्या जूनमधील प्रारंभाच्या वेळी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी हे तत्त्व स्पष्ट केले होते. या प्रसंगी मा. मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते की "या उपक्रमांमुळे नागरिकांसाठी सरकारी सेवा अधिक जलद, सोप्या आणि पारदर्शक होतील."

मा. मुख्यमंत्र्यांनी 'महत्त्वपूर्ण सुधारणा' या शब्दांत महाडीबीटी 2.0 चे वर्णन केले असून, निश्चित कालमर्यादेत विविध विभागांच्या योजना या एकात्मिक व्यासपीठावर आणण्याचे निर्देश दिले आहेत. विविध विभागांमध्ये विखुरलेल्या प्रणालींपासून दूर जाऊन कल्याणकारी योजनांच्या लाभ वितरणासाठी एक समान डिजिटल रचना निर्माण करणे हा यामागील उद्देश आहे.

15 ऑगस्ट रोजी झालेल्या शुभारंभाचे महत्त्व या विस्ताराच्या व्यापकतेत आहे. आणखी 29 योजना समाविष्ट झाल्याने महाडीबीटी 2.0 वर आता वैयक्तिक लाभाच्या एकूण 105 योजना उपलब्ध झाल्या आहेत. नव्याने एकत्रित करण्यात आलेल्या योजनांमध्ये उच्च व तंत्रशिक्षण, इतर मागास बहुजन कल्याण, कृषी, पशुसंवर्धन,

दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय तसेच विविध उपजीविका आणि शैक्षणिक सहाय्याशी संबंधित योजनांचा समावेश आहे.

याचा अर्थ महाडीबीटी आता केवळ शिष्यवृत्ती किंवा अनुदानासाठीचे व्यासपीठ राहिलेले नाही. विविध सरकारी सहाय्य योजना एका समान व्यासपीठावर आणून पात्र नागरिकांना त्या शोधणे, त्यांचा लाभ घेणे आणि अर्जाची स्थिती जाणून घेणे अधिक सुलभ करणारे संधीचे डिजिटल प्रवेशद्वार म्हणून महाडीबीटी विकसित होत आहे. विद्यार्थ्यांसाठी ही संधी शिक्षण शुल्कासाठीची शिष्यवृत्ती, वसतिगृहासाठीची मदत किंवा व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणासाठी आर्थिक सहाय्याच्या स्वरूपात असू शकते. शेतकऱ्यासाठी कृषी उपकरणे, सिंचन आणि उत्पादकता व उपजीविका बळकट करणाऱ्या इतर पात्र बाबींसाठी मदत मिळू शकते. पात्र समुदायांतील तरुणांना शैक्षणिक सहाय्य तसेच स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमांचा लाभ मिळू शकतो.

त्याचप्रमाणे पशुधन, दुग्धव्यवसाय किंवा मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेल्या ग्रामीण कुटुंबांसाठी महाडीबीटी हे स्वतंत्र विभागीय प्रणालींमध्ये जाण्याची गरज कमी करून पात्र सरकारी मदत मिळविण्यासाठीचे समान डिजिटल माध्यम उपलब्ध करून देते. अशा प्रकारे महाडीबीटी 2.0 चा विस्तार म्हणजे केवळ पोर्टलवर योजनांची संख्या वाढवणे नव्हे. शिक्षण, उपजीविका, कृषी आणि सामाजिक कल्याणाच्या योजना एका पारदर्शक आणि अधिकाधिक एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वाराच्या माध्यमातून नागरिकांच्या जवळ आणणे हा त्यामागील व्यापक उद्देश आहे. सरकारी लाभ नागरिकांना अधिक सहजपणे शोधता येतील, त्यांचा मागोवा घेता येईल आणि ते अधिक थेट पद्धतीने उपलब्ध होतील.

## नागरिकांसाठी सेवांची सुलभता हीच महत्त्वाची सुधारणा

महाडीबीटी 2.0 मधील सर्वात महत्त्वाची सुधारणा स्क्रीनवर दिसणारे एखादे वैशिष्ट्य नसून नागरिकांना कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांमध्ये होणारी घट ही आहे. महाडीबीटी 2.0 एका वेगळ्या पद्धतीकडे वाटचाल करते. सरकारकडे एखादी माहिती आधीपासून उपलब्ध असेल, तर ती नागरिकाने पुन्हा पुन्हा देण्याची गरज नसावी. यामुळे वारंवार माहिती भरावी लागण्याचे प्रमाण कमी होते, चुका होण्याची शक्यता घटते आणि मोठे डिजिटल अर्ज भरण्यात येणारी अडचण कमी होऊन नागरिकांसाठी अर्ज प्रक्रिया अधिक सोपी होऊ शकते.

महाराष्ट्र शासनाच्या व्यापक प्रशासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering) या उपक्रमाशीही हे सुसंगत आहे. या अंतर्गत विभागांना प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, अनावश्यक कागदपत्रांची संख्या कमी करण्यासाठी आणि नागरिकांचे सरकारी व्यवहार अधिक सुलभ करण्यासाठी प्रयत्न करण्यास सांगण्यात आले आहे.

## शिष्यवृत्ती : डिजिटल लाभ वितरणातून शैक्षणिक संधी

महाडीबीटी 2.0 डिजिटल प्रशासनाचे प्रत्यक्ष सामाजिक सक्षमीकरणात रूपांतर करू शकणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या क्षेत्रांपैकी एक म्हणजे शिक्षण. विद्यार्थी आणि कुटुंबांसाठी शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य मिळणे हे उच्च किंवा व्यावसायिक शिक्षण सुरू ठेवता येईल की नाही, यासाठी अनेकदा निर्णायक ठरू शकते. महाराष्ट्राने महाशिष्यवृत्तीच्या (MahaScholarship) माध्यमातून इयत्ता दहावीनंतरच्या शिष्यवृत्ती प्रक्रियांना एकात्मिक महाडीबीटी 2.0 व्यासपीठावर आणून ही प्रक्रिया अधिक सोपी, जलद आणि पारदर्शक करण्याचा प्रयत्न केला आहे. यापूर्वी शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेत अनेक अर्ज, कागदपत्रे वारंवार सादर करणे, वेगवेगळ्या विभागीय प्रक्रिया आणि पडताळणीच्या अनेक पातळ्यांचा समावेश होता.

नव्या प्रक्रियेत ही गुंतागुंत मोठ्या प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अर्जातील रकाने 130 वरून कमी करून 65 करण्यात आले आहेत. शक्य असेल तेथे आधार आणि सीईटी प्रणालीसारख्या सरकारी डेटाबेसमधून संबंधित माहिती घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. पडताळणीची रचनाही चार स्तरांवरून दोन स्तरांवर आणण्यात आली आहे. नूतनीकरणाच्या अर्जांमध्ये आधीच उपलब्ध माहिती भरलेली असू शकते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी दरवर्षी तीच माहिती पुन्हा भरण्याची गरज नाही.

उत्पन्नावर आधारित योजनांसाठी पहिल्या वर्षी सादर केलेले उत्पन्न प्रमाणपत्र, लागू योजनेच्या नियमांच्या अधीन राहून, संपूर्ण अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी वैध राहू शकते. कागदावर या सुधारणा तांत्रिक वाटू शकतात; मात्र त्यांचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो. अर्जातील रकाने कमी झाल्यामुळे चुका होण्याची शक्यता आणि गुंतागुंतीच्या अर्जात लागणारा वेळ कमी होऊ शकतो. पडताळणीच्या अनेक पातळ्या कमी केल्यामुळे अर्जापासून मंजुरीपर्यंतचा कालावधी कमी होण्यास मदत होऊ शकते. आधीच पात्रता सिद्ध केलेल्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वी भरलेल्या अर्जाच्या माहितीमुळे नूतनीकरण अर्ज दरवर्षीची पुनरावृत्ती कमी करतात.

अर्थात याद्वारे तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ शिष्यवृत्ती अर्ज डिजिटल करण्यासाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांवरील प्रशासकीय भार कमी करण्यासाठी सुद्धा केला जातो आहे. व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुधारणा विशेष महत्त्वाची आहे. शिक्षण शुल्क, वसतिगृहाचा खर्च आणि दैनंदिन राहणीमानाचा खर्च यामुळे कुटुंबांवर मोठा आर्थिक भार पडू शकतो. सोप्या आणि सहज करता येणाऱ्या शिष्यवृत्ती प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याचा अधिक आत्मविश्वास मिळू शकतो. अनेक कुटुंबांसाठी वेळेवर मिळणारी आर्थिक मदत ही केवळ सरकारी सुविधा नसून विद्यार्थ्याने शिक्षण सुरू ठेवणे, महाविद्यालयात टिकून राहणे आणि चांगल्या करिअरच्या संधींकडे वाटचाल करणे यावर थेट परिणाम करणारी बाब असू शकते.

महाडीबीटीच्या एका शिष्यवृत्ती लाभार्थी विद्यार्थ्याने सांगितले की पूर्वी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना मोठा अर्ज भरावा लागे, कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागे आणि अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी महाविद्यालयाशी वारंवार संपर्क साधावा लागे. सोप्या ऑनलाइन प्रक्रियेमुळे आता अर्ज करणे आणि त्याची प्रगती जाणून घेणे अधिक सोपे झाले आहे. शिष्यवृत्तीमुळे कुटुंबावर संपूर्ण आर्थिक भार न टाकता उच्च शिक्षण सुरू ठेवण्याचा आत्मविश्वास मिळतो आहे.

त्यामुळे महाशिष्यवृत्तीतील परिवर्तन हे केवळ प्रक्रियेच्या पुनर्रचनेपुरते मर्यादित नाही. हे नागरिकाभिमुख प्रशासनाच्या व्यापक तत्त्वाचे प्रतिबिंब आहे. सरकारने तंत्रज्ञानाचा उपयोग फक्त विद्यमान गुंतागुंतीची प्रक्रिया ऑनलाइन करण्यासाठी नव्हे, तर नागरिकाचा प्रवास अधिक सोपा करण्यासाठी केला पाहिजे.

## कृषी आणि ग्रामीण उपजीविकेसाठी डिजिटल सहाय्य

महाडीबीटी 2.0 मधील हा उपक्रम थेट लाभ हस्तांतरणाच्या व्यापक दृष्टिकोनाकडे महाराष्ट्राची वाटचाल दर्शवितो. राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी आणि त्यासंबंधित उपक्रमांचे महत्त्व कायम आहे. कृषी, सिंचन, शेती उपकरणे आणि इतर मंजूर बाबींसाठी पात्र सरकारी मदत डिजिटल माध्यमातून मिळवण्याची सुविधा शेतकरी आणि ग्रामीण कुटुंबांसाठी उपयुक्त ठरू शकते. हीच डिजिटल रचना आता पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय यांसारख्या क्षेत्रांमध्येही विस्तारली जात आहे. ग्रामीण उपजीविका क्वचितच एका व्यवसायावर अवलंबून असते. एखादे शेतकरी कुटुंब पीक उत्पादनासोबत दुग्धव्यवसाय, पशुपालन किंवा मत्स्यव्यवसायही करू शकते.

या व्यापक उपजीविका परिसंस्थेची दखल घेणारी डिजिटल कल्याणकारी व्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये सरकारी मदत अधिक सहज उपलब्ध करून देऊ शकते. डिजिटल अर्ज, प्रमाणीकरण, पडताळणी आणि बँक खात्याशी जोडलेले थेट हस्तांतरण यामुळे लाभ वितरण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता निर्माण होते.

नागरिकांचा या सर्व प्रक्रियेकडे बघताना दृष्टिकोन देखील बदलतो. जसे की "माझा अर्ज विभागाकडे पोहोचला आहे का?" याऐवजी "माझा अर्ज सध्या कुठे आहे? त्याची स्थिती काय आहे? पुढील टप्पा कधी अपेक्षित आहे?" ही पारदर्शकता जबाबदार प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. थेट लाभ हस्तांतरणाची संकल्पना मंजूर लाभातील गळती कमी करून पात्र लाभार्थ्यांपर्यंत लाभ थेट पोहोचवण्यासाठी करण्यात आली.

महाडीबीटी ही संकल्पना डिजिटल प्रक्रियेतच अर्ज, प्रमाणीकरण, पडताळणी, मंजुरी, अर्जाचा मागोवा आणि थेट लाभ हस्तांतरण या संपूर्ण प्रवासाला एकत्र जोडून प्रत्येक टप्प्यावर पारदर्शक डिजिटल नोंद तयार केली जाते. अर्ज सादर केल्यानंतरही नागरिक प्रक्रियेशी जोडलेले राहतात. प्रशासनालाही विलंब, पुनरावृत्ती आणि प्रक्रियेतील अडथळे अधिक स्पष्टपणे दिसू शकतात.

थेट लाभ हस्तांतरणामुळे शिष्यवृत्ती वितरणातील पारदर्शकता वाढण्यास आणि अनियमितता कमी करण्यास मदत झाल्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केले आहे. सरकारी योजनांमध्ये याचा व्यापक वापर केल्यास महाराष्ट्राच्या संपूर्ण कल्याणकारी परिसंस्थेत या फायद्यांचा विस्तार होण्याची अपेक्षा आहे. आधार आधारित प्रमाणीकरण आणि बँक खात्याशी जोडणी यामुळे मंजूर लाभ योग्य पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचण्याची संरचित व्यवस्था उपलब्ध होते. केवळ तंत्रज्ञानाचा वापर करणे हा उद्देश्य नाही तर अर्जाचा मागोवा घेता येईल, निर्णयाची प्रक्रिया पाहता येईल आणि मंजूर झालेला लाभ ज्या नागरिकासाठी आहे, त्याच्यापर्यंत पोहोचेल हा विश्वास निर्माण होईल.

## 'Know Your Benefit': लाभार्थ्यांना हक्कांची जाणीव

नव्या व्यासपीठाच्या महत्त्वाच्या संकल्पनांपैकी एक म्हणजे नागरिकांना ते कोणत्या योजनांसाठी पात्र आहेत हे समजण्यास मदत करणे. सरकारी कल्याणकारी व्यवस्था अनेकदा गुंतागुंतीची असते. नागरिकांना योजना अस्तित्वात आहेत हे माहीत असते; परंतु त्यापैकी कोणती योजना त्यांच्यासाठी लागू आहे हे माहीत नसू शकते.

'Know Your Benefit' ही संकल्पना पात्रतेच्या आधारे नागरिकांना संबंधित योजना शोधण्यास मदत करून ही तफावत कमी करण्याचा प्रयत्न करते. यामुळे विभागकेंद्री दृष्टिकोनातून नागरिककेंद्री व्यासपीठाकडे महत्त्वपूर्ण बदल होतो. नागरिकाला लाभ शोधण्यासाठी संबंधित सरकारी विभागाचे नाव माहीत असण्याची गरज नसावी; त्याच्यासाठी उपलब्ध संधी शोधण्याच्या कामी प्रणालीने मदत केली पाहिजे.

महाडीबीटी 2.0 स्वतंत्रपणे कार्यरत नसून महाराष्ट्राच्या व्यापक डिजिटल प्रशासन व्यवस्थेचा भाग म्हणून विकसित होत आहे. आपले सरकार, महाआयडी आणि महासारथी यांसारख्या व्यासपीठांसोबत त्याची संलग्नता वाढत आहे. पडताळणी, नागरिकांचा डेटा, सरकारी सेवा आणि कल्याणकारी योजनांचे लाभ वितरण या सर्वांनी प्रणाली म्हणून स्वतंत्र न राहता परस्परांशी समन्वय राखत काम करावे, ही यामागील व्यापक संकल्पना आहे.

उदाहरणार्थ, महासारथी उपक्रम अधिक एकात्मिक डेटा परिसंस्था उभारण्याच्या दिशेने काम करत आहे, जी अधिक कार्यक्षम लाभ वितरण आणि चांगल्या धोरणात्मक नियोजनाला मदत करू शकते. मुख्यमंत्री महोदयांनी अधोरेखित केल्याप्रमाणे, अशा एकात्मिक व्यवस्थेमुळे पुनरावृत्ती कमी करणे, गैरवापर ओळखणे आणि पात्र नागरिकांना कमी अडथळ्यांसह लाभ मिळवून देणे शक्य होऊ शकते.

या उदयोन्मुख व्यवस्थेतील पडताळणी नागरिक कोण आहे हे निश्चित करते, डेटा पात्रता ठरवण्यास मदत करते, महाडीबीटी लाभ वितरित करते, आपले सरकार सेवा उपलब्ध करून देते, डॅशबोर्ड सरकारला परिणामांवर लक्ष ठेवण्यास मदत करतात आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अधिक चांगल्या प्रशासकीय निर्णयांना सहाय्य करू शकते. अशा प्रकारे स्वतंत्र डिजिटल व्यासपीठे अधिक संलग्न, बुद्धिमान आणि नागरिकाभिमुख सार्वजनिक सेवा व्यवस्थेचे घटक बनू शकतात.

## 'डिजिटल बाय डिफॉल्ट' नव्हे, तर 'डिजिटल विथ असिस्टेड ॲक्सेस'

खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक डिजिटल प्रशासन व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरिकाची डिजिटल साक्षरता, इंटरनेट उपलब्धता आणि डिजिटल सेवांची उपलब्धता समान नसते, हे लक्षात घेतले पाहिजे. अशा वेळी महाराष्ट्रातील आपले सरकार सेवा केंद्रे महत्त्वाची भूमिका बजावतात. डिजिटल सेवांच्या बाबतीत आत्मविश्वास असलेला नागरिक स्वतःहून व्यासपीठाचा वापर करू शकतो; तर मदतीची गरज असलेला नागरिक सेवा केंद्राच्या माध्यमातून त्याच डिजिटल सरकारी सेवांचा लाभ घेऊ शकतो.

त्यामुळे मूलभूत तत्त्व केवळ 'डिजिटल बाय डिफॉल्ट' नसून 'डिजिटल विथ असिस्टेड ॲक्सेस', म्हणजेच आवश्यकतेनुसार सहाय्य उपलब्ध असलेले डिजिटल प्रशासन, असे आहे. ग्रामीण नागरिक, ज्येष्ठ नागरिक, मर्यादित डिजिटल साक्षरता असलेले नागरिक आणि डिजिटल उपकरणे किंवा सेवा नियमितपणे उपलब्ध नसलेल्यांसाठी हा दृष्टिकोन विशेष महत्त्वाचा आहे. कल्याणकारी योजनांची परीभाषाही बदलत आहे.

शासकीय लाभ घेणाऱ्या व्यक्तीला पारंपरिकपणे 'लाभार्थी' म्हटले जाते. मात्र आधुनिक डिजिटल प्रशासन नागरिकाला अधिक सक्षम बनवू शकते. त्याला कोणते लाभ मिळण्याचा अधिकार आहे हे

समजते, तो स्वतःहून किंवा सहाय्याने अर्ज करू शकतो, अर्जाचा मागोवा घेऊ शकतो, प्रक्रिया समजून घेऊ शकतो आणि पारदर्शक पद्धतीने लाभ मिळवू शकतो.

हे केवळ लाभ वितरण नाही तर प्रशासनातील नागरिकांचा सहभाग आहे. विद्यार्थ्यांसाठी याचा अर्थ उच्च शिक्षण घेण्याचा अधिक आत्मविश्वास असू शकतो. शेतकऱ्यांसाठी उत्पादक साधने आणि सरकारी मदतीपर्यंत अधिक चांगली पोहोच होऊ शकते. महिला आणि तरुणांसाठी शिक्षण, कौशल्य आणि आर्थिक संधींचे मार्ग खुले होऊ शकतात. ग्रामीण समुदायांसाठी सरकारी कार्यक्रम आणि त्या कार्यक्रमांसाठी असलेल्या नागरिकांमधील अंतर कमी होऊ शकते.

## पुढील यशाचे मोजमाप कसे होईल?

महाडीबीटी 2.0 चे अंतिम यश केवळ किती योजना व्यासपीठावर आणल्या यावर मोजले जाऊ नये. किती नागरिकांनी एखादी संधी शोधली, तिचा यशस्वीपणे लाभ घेतला आणि सरकारची सेवा अधिक सोपी, पारदर्शक आणि प्रतिसादक्षम असल्याचा अनुभव घेतला यावर त्याचे यश मोजले गेले पाहिजे.

## पुढील वाटचाल : योजना अनेक, डिजिटल प्रवेशद्वार एक

हा उपक्रम एक महत्त्वाचा टप्पा आहे; मात्र ही केवळ सुरुवात आहे. इतर सर्व विभागांबरोबर इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या समन्वित प्रयत्नांतून सरकारी योजना एका समान डिजिटल व्यासपीठावर आणण्याची राज्याची दिशा स्पष्ट आहे. मात्र हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केवळ तंत्रज्ञान पुरेसे नाही.

विभागांना प्रक्रियांची पुनर्रचना करावी लागेल, डेटाचे प्रमाणीकरण करावे लागेल, स्पष्ट सेवास्तरीय अपेक्षा निश्चित कराव्या लागतील, विभागांमधील समन्वय मजबूत करावा लागेल आणि नागरिकांच्या अनुभवाचे सातत्याने मोजमाप करावे लागेल. महाडीबीटीची प्रगती केवळ पोर्टलवर अवलंबून राहणार नाही, तर त्याभोवती उभारल्या जाणाऱ्या संपूर्ण परिसंस्थेच्या गुणवत्तेवर अवलंबून असेल. हे व्यासपीठ अधिक एकात्मिक, प्रतिसादक्षम आणि नागरिककेंद्री कल्याणकारी लाभ वितरण व्यवस्थेचा पाया बनू शकते.

कृत्रिम बुद्धिमत्ता नागरिकांना त्यांच्या गरजांशी संबंधित योजना शोधण्यात मदत करू शकते. सरकारी डेटा वारंवार अर्ज भरणे आणि कागदपत्रे सादर करण्याची गरज कमी करू शकतो. प्रगत विश्लेषणाच्या माध्यमातून प्रक्रियेतील अडथळे ओळखता येऊ शकतात आणि ज्या ठिकाणी हस्तक्षेपाची गरज आहे ती क्षेत्रे अधोरेखित करता येऊ शकतात.

रिअल-टाइम डॅशबोर्डच्या माध्यमातून प्रशासनाला अर्ज, प्रलंबित प्रकरणे आणि लाभ वितरणावर अधिक प्रभावीपणे लक्ष ठेवता येऊ शकते. डिजिटल ओळख प्रमाणीकरण मजबूत करून सेवा मिळवणे सोपे करू शकते, तर एकात्मिक तक्रार निवारण प्रणाली अर्ज, सेवा वितरण आणि तक्रारींचे निराकरण यांच्यात अधिक मजबूत दुवा निर्माण करू शकते.

त्याचवेळी, डिजिटल सेवांचा वापर करण्यासाठी मदतीची गरज असलेल्या नागरिकांना वगळले जाऊ नये यासाठी सहाय्यित डिजिटल माध्यमेही आवश्यक राहतील. उद्देश केवळ सरकारी योजना डिजिटल करणे नसून त्या प्रत्येक नागरिकासाठी अधिक सोप्या, पारदर्शक आणि सुलभ बनवणे, हा असला पाहिजे.

महाराष्ट्राने आपल्या डिजिटल प्रशासनाच्या परिसंस्थेत अशा अनेक घटकांची उभारणी सुरू केली आहे. महाडीबीटी 2.0 त्यांना नागरिकांच्या अधिक जवळ आणते. लाभ वितरणाच्या व्यासपीठापासून अधिक संलग्न, पारदर्शक आणि सहभागी प्रशासनाचे साधन म्हणून तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दिशेने वाटचाल करते.

## निष्कर्ष

थेट लाभ हस्तांतरणाची संकल्पना सुरुवातीला लाभ कुठे पोहोचतो, हे बदलण्यावर केंद्रित होती. सरकारी व्यवस्थेतून थेट पात्र व्यक्तीच्या बँक खात्यात पैसे जाणे हा उद्देश्य होता. महाडीबीटी 2.0 आता संपूर्ण लाभ वितरणाचा प्रवास कसा घडतो, याची नवी परिभाषा करण्यास सुरुवात करत आहे. सरकारी लाभ अधिक सहजपणे शोधता येतील, उपलब्ध होतील, त्यांची पडताळणी आणि मागोवा घेता येईल, तसेच ते अधिक पारदर्शक आणि थेट पद्धतीने मिळतील, हा यामागील उद्देश आहे.

अर्थात 15 ऑगस्ट रोजी झालेल्या शुभारंभाचे महत्त्व केवळ 29 नवीन योजना जोडण्यापुरते मर्यादित नाही. व्यवहाराधारित व्यासपीठापासून संधीच्या व्यापक डिजिटल प्रवेशद्वारामध्ये महाडीबीटीचे होत असलेले रूपांतर हा त्याचा खरा अर्थ आहे. दृष्टीकोन अधिकाधिक स्पष्ट होत आहे. एखादा नागरिक ज्या लाभासाठी पात्र आहे, तो मिळवण्यासाठी त्याला सरकारी व्यवस्थेतील गुंतागुंत स्वतः समजून घेण्याची आणि त्यातून मार्ग काढण्याची गरज नसावी. सरकारने नागरिकाच्या वतीने ही गुंतागुंत हाताळली पाहिजे. जेव्हा तंत्रज्ञान हे शक्य करते, तेव्हा डिजिटल प्रशासन केवळ माहिती तंत्रज्ञानाचा प्रकल्प राहत नाही; ते नागरिकांच्या सक्षमीकरणाचे साधन बनते.

महाडीबीटी 2.0 महाराष्ट्राच्या डिजिटल परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेले एक महत्त्वाचे तत्त्व स्पष्ट करते. तंत्रज्ञान नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडथळे कमी करते, तेव्हा त्यातून सर्वाधिक सार्वजनिक मूल्य निर्माण होते. त्यामुळे महाआयटीची भूमिका केवळ पोर्टल तयार करण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. अधिक सोपी, जलद, पारदर्शक, डेटाआधारित आणि नागरिकाभिमुख डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे ही महाआयटीची वाढती भूमिका आहे. महाडीबीटी 2.0 हा या परिवर्तनातील एक महत्त्वाचा भाग आहे. त्याचे खरे यश स्क्रीन, अर्ज किंवा सॉफ्टवेअर मॉड्यूलच्या संख्येवरून मोजले जाणार नाही.

एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षण सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेली शिष्यवृत्ती मिळते, एखाद्या शेतकऱ्याला त्याच्या उपजीविकेसाठी वेळेवर मदत मिळते किंवा एखाद्या नागरिकाला पूर्वी त्याच्यापर्यंत न पोहोचलेली सरकारी संधी सहजपणे शोधता येते त्या क्षणी डिजिटल प्रशासनाचे खऱ्या अर्थाने प्रशासनात रूपांतर झालेले असते.



# विशेष अहवाल: अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतन (एमबीयू)

## बालकांची डिजिटल ओळख भविष्यासाठी सज्ज करण्यासाठी महाराष्ट्राचे अभियान

डिजिटल प्रशासन नागरिकांच्या राहण्याच्या, शिकण्याच्या आणि भविष्य घडवण्याच्या ठिकाणी पोहोचते, तेव्हाच ते अर्थपूर्ण ठरते. आधार अद्यतनाची सेवा थेट शाळा आणि बालकांपर्यंत पोहोचवून महाराष्ट्राची अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतन (एमबीयू) मोहीम, हा विचार प्रत्यक्षात अंमलात आणत आहे.

ही शिबिरे तंत्रज्ञान, शाळा, प्रशासक, परिचालक आणि कुटुंबे अशा भागधारकांमध्ये एक समान दुवा निर्माण करत आहेत. बालकांचे आधार तपशील अद्ययावत करणारी ही शिबिरे म्हणजे निव्वळ बायोमेट्रिक अद्यतन नाही, तर बालकांची डिजिटल ओळख अधिक सोपी, सुलभ आणि सोयीस्कर बनवण्याची एक संधी आहे.

धाराशिव जिल्ह्यातील येवती येथील पीएम श्री जी प्रशालेमध्ये इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी एमबीयू शिबिर आयोजित करण्यात आले होते. लहान मुलांचे आधार तपशील अद्ययावत करण्यासाठी पालकांना आपल्या दैनंदिन कामातून वेळ काढावा लागतो, दुसऱ्या ठिकाणी प्रवास करावा लागतो. अनेकदा मुलांना आधार केंद्रावर नेणे पालकांच्या दृष्टीने गैरसोयीचे असू शकते.

शाळेत आयोजित केली जाणारी आधार अद्यतन शिबिरे या समस्येवर अचूक उपाय ठरत आहेत. मुले शाळेत नियमित येतात, शिक्षक आणि शालेय प्रशासन शाळेत उपस्थित असतेच. आता या शिबिरांच्या निमित्ताने आधार सेवा सुद्धा थेट शाळेच्या परिसरात उपलब्ध करून देता आली आहे.

या गावातील शिबिराला आधार केंद्र परिचालक नवनाथ हनुमंत बुरुंगे यांचे सहकार्य लाभले, ज्यांनी विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक अद्यतन प्रक्रिया सुलभ करण्यास मदत केली.

शालेय विद्यार्थ्यांसाठी सुद्धा हा अनुभव सोपा ठरला. शाळेत उपस्थित राहा, अद्यतन प्रक्रियेत सहभागी व्हा आणि आपली नियमित कामे सुरू ठेवा, इतके हे सोपे होते. डिजिटल सेवा नागरिकांच्या जवळ आणल्यामुळे अद्यतनाचे हे काम अगदीच सोपे झाले. त्यासाठी वापरण्यात आलेले तंत्रज्ञान अत्याधुनिक असले तरी नागरिकांसाठीचा अनुभव क्लिष्ट नव्हता, सुलभ होता.

**एमबीयू म्हणजे काय?**
**मँडेटरी बायोमेट्रिक अपडेट (एमबीयू)**

एमबीयू म्हणजे अनिवार्य बायोमेट्रिक अद्यतन. या प्रक्रियेअंतर्गत बालकाच्या वाढीनुसार त्याच्या आधार कार्डमधील बायोमेट्रिक माहितीचे अर्थात छायाचित्र, बोटांचे ठसे आणि दोन्ही डोळ्यांच्या बुबुळांचे स्कॅन अद्ययावत केले जाते. या प्रक्रियेमध्ये आधार क्रमांक बदलत नाही. बालकाची डिजिटल ओळख अचूक आणि वापरण्यायोग्य राहील याची खातरजमा



करण्यासाठी बायोमेट्रिक माहिती अद्ययावत केली जाते. UIDAI नुसार बालपणाच्या दोन महत्त्वाच्या टप्प्यांवर बायोमेट्रिक अद्यतने आवश्यक आहेत.

येवती येथील श्री समर्थ आश्रम शाळेतसुद्धा या शिबिराचे आयोजन करण्यात आले. आधार केंद्र परिचालक शाहिद शाहबुद्दीन पठाण यांनी या शिबिरासाठी मार्गदर्शन केले.

अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांनी एकत्र येण्याचे ठिकाण म्हणजे शाळा, इतका शाळेचा अर्थ संकुचित नाही. शाळा हा कुटुंबे आणि सार्वजनिक संस्था यांच्यातील संवादाचा एक मजबूत दुवा सुद्धा आहे. शिक्षक आणि शालेय प्रशासक नियमितपणे पालकांशी संवाद साधतात आणि आपल्या विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेतात. त्यामुळे शाळा शासकीय सेवा वितरणाच्या दृष्टीने प्रभावी ठिकाणे ठरतात.

शाळेसारख्या विद्यमान संस्था डिजिटल प्रशासनाला कशा प्रकारे हातभार लावू शकतात, हे या अभियानाच्या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. आधार अद्यतनासारख्या आवश्यक बाबींसाठी, प्रत्येक लाभार्थीपर्यंत पोहोचणारी प्रणाली नव्याने तयार करण्याऐवजी, आधीपासूनच अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधा आणि संबंधांचा वापर करणे उपयुक्त असल्याचे या मोहिमेने सिद्ध केले आहे.

या मोहिमेने बालकांच्या आधार अद्यतनासाठी सेवा केंद्रांमध्ये फेऱ्या मारण्याच्या आणि त्यासाठी कागदपत्रे जमवण्याच्या त्रासातून पालकांची सुटका केली आहे, प्रशासकांसाठी समन्वयाचे काम सोपे केले आहे आणि बालकांसाठी एक महत्त्वाची शासकीय डिजिटल ओळख त्यांच्या परिचित वातावरणात उपलब्ध करून दिली आहे.

या मोहिमेअंतर्गत अंतरगाव येथील अंतरगाव हायस्कूलमध्येही स्थानिक आधार सेवा नेटवर्कच्या सहकार्याने एमबीयू शिबिराचे नियोजन करण्यात आले.

आधार केंद्र परिचालक सचिन नागनाथ कासबे आणि परिचालक पार्थ हनुमंत हवाले यांनी या शिबिराची धुरा समर्थपणे सांभाळली. अशा

प्रकारचे उपक्रम यशस्वी होण्यामागे अशा अनेक भागधारकांचा सक्रिय सहभाग असतो, त्यांच्या समन्वयामुळेच असे उपक्रम यशस्वी होतात.

**एमबीयूची आवश्यकता कोणाला आहे?**

आधार नोंदणी पूर्ण केलेल्या आणि निर्धारित वयाचा टप्पा गाठलेल्या बालकांना या शिबिरांतर्गत आधार अद्यतन प्रक्रिया पूर्ण करता येते.

| **वय** | **एमबीयू टप्पा** | **प्रक्रिया** |
|---|---|---|
| 5 वर्षे | एमबीयू -I | छायाचित्र, बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बाहुल्यांचे अद्यतन |
| 15 वर्षे | एमबीयू -II | छायाचित्र, बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बाहुल्यांचे पुन्हा अद्यतन |

देवकुर्ली येथील नरेंद्र बोरगावकर विद्यालयात, एमबीयू उपक्रमाने शालेय सेवा वितरणाचा एक आदर्श घालून दिला आहे. शाळेचे वातावरण बालके आणि त्यांच्या पालकांशी अगदी सहज संपर्क साधते. त्याचबरोबर अदयतनासाठी पात्र विद्यार्थ्यांना ओळखून त्यांचे तपशील अद्ययावत करण्यासाठी अनुकुल वातावरण प्रदान करते, जिथे पात्र विद्यार्थ्यांना प्रक्रियेत मार्गदर्शन केले जाऊ शकते.

सचिन नागनाथ कसबे आणि परिचालक पार्थ हनुमंत हवाले यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले.

आधार अद्यतनासाठी वय वर्षे पाच आणि वय वर्षे पंधरा असे दोन टप्पे निर्धारित करण्यात आले आहेत. योग्य टप्प्यावर बालकांचे आधार तपशील अद्ययावत केल्याने, बालकाच्या आधार नोंदी त्यांच्या वयाशी सुसंगत राहतात.

शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश, परीक्षा, किंवा शिष्यवृत्ती प्रक्रियेदरम्यान बालकांना आधार प्रमाणीकरणाअभावी उद्भवणाऱ्या समस्येचा सामना करावा लागणार नाही, हा यामागचा सर्वात मोठा फायदा होय.




सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात, माळगाव येथील प्रकाश इंग्लिश मीडियम स्कूलपर्यंतही एमबीयू मोहिमेचे शिबिर पोहोचले आहे. प्रत्येक कुटुंबाने स्वतंत्रपणे आधार केंद्र शोधून आपापल्या बालकांच्या तपशील अद्यतनासाठी प्रयत्न करण्याऐवजी, या शिबिराच्या माध्यमातून शाळेनेच ही सेवा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत केली.

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा विद्यमान संस्थांच्या माध्यमातून कशा प्रकारे जनहितार्थ कार्य करू शकतात, याचे हे एक प्रभावी उदाहरण आहे. सेवा डिजिटल असली तरी, ती देण्याची पद्धत मानवी आहे.

बायोमेट्रिक अद्यतनामध्ये केवळ छायाचित्र, बोटांचे ठसे आणि डोळ्यांच्या बाहुलीच्या तपशिलांचा समावेश असतो, हे खरे असले तरी वरकरणी सोप्या दिसणाऱ्या या प्रक्रियेमागे शाळा, परिचालक, प्रशासक, तंत्रज्ञान आणि कुटुंबांचे एकत्रित प्रयत्न समाविष्ट असतात. नागरिक आणि शासकीय सेवांमधली दरी कमी करणे, हे या मोहिमेचे खरे उद्दिष्ट आहे.

लाभार्थी बालकासाठी एमबीयू शिबिर म्हणजे शाळेतील काही मिनिटांचा उपक्रम असू शकतो. कुटुंबांच्या दृष्टीने आधार केंद्रावर एक फेरी कमी मारावी लागणे असू शकते. प्रशासनाच्या दृष्टीने प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होणे, हा लाभ असू शकतो तर त्या बालकांच्या दृष्टीने, हवे असतील तेव्हा शासकीय लाभ प्राप्त होण्याची खात्री असू शकते. नागरिकाभिमुख डिजिटल प्रशासन प्रत्यक्षात कसे असेल, हे या उपक्रमावरून सहज लक्षात येते.



लहान वयात आधार क्रमांक प्राप्त झालेल्या बालकांच्या दृष्टीने हे अद्यतन विशेष महत्वाचे आहे. ही बालके मोठी होतात, तसतसे त्यांच्या बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बाहुलीचे नमुने आणि चेहऱ्याची वैशिष्ट्ये बदलतात, परिणामी आधारमधील त्यांचे बायोमेट्रिक तपशील अद्ययावत करणे आवश्यक होते. एमबीयू शिबिरांचा हाच उद्देश आहे. या शिबिरांच्या निमित्ताने बालकांची डिजिटल ओळख अचूक, वापरण्यायोग्य आणि भविष्यासाठी सज्ज राहील याची खातरजमा करण्यासाठी तंत्रज्ञान, जिल्हा प्रशासन, शाळा, क्षेत्रीय विभाग आणि आधार पायाभूत सुविधा अशा सर्व घटकांना एकत्र आणले आहे.

**लक्षात ठेवा:**

5 वर्षे = पहिले बायोमेट्रिक अद्यतन

15 वर्षे = दुसरे बायोमेट्रिक अद्यतन

ही गोष्ट आधार क्रमांकाबद्दल आहेच, पण त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे, ही डिजिटल समावेशनाची कथा आहे, नागरिकांची सोय आणि सार्वजनिक सेवा वितरणाच्या भवितव्याची कहाणी आहे. आयुष्यभरासाठी कायम राहणारा डिजिटल ओळख क्रमांक म्हणून आधार क्रमांक तयार करण्यात आला आहे. आधार क्रमांक तोच राहतो, परंतु मूल जसजसे मोठे होते, तसतसे त्याचे बायोमेट्रिक तपशील अद्ययावत करणे आवश्यक असते. UIDAI च्या नियमांनुसार, वयाच्या पाचव्या वर्षी आणि पुन्हा पंधराव्या वर्षी बायोमेट्रिक तपशील

अद्ययावत करणे आवश्यक आहे. या टप्प्यांवर बालकाचे छायाचित्र, बोटांचे ठसे आणि डोळ्यांच्या बुबुळांचा तपशील अद्ययावत केला जातो, आणि आधार क्रमांकात कोणताही बदल होत नाही. सोप्या भाषेत सांगायचे तर ओळख क्रमांक तोच राहतो, पण बायोमेट्रिक्स विकसित होत जातात. हे बदल आधार यंत्रणेमध्ये अद्ययावत करण्याच्या दृष्टीने MBU उपक्रम महत्वाचा ठरतो आहे.

गेली अनेक वर्षे बालकांचे बायोमेट्रिक तपशील अद्ययावत करणे, ही प्रामुख्याने पालकांची जबाबदारी मानली जात असे. हे तपशील अद्ययावत करण्यासाठी सदर कुटुंबाला संबंधित बालकासह आधार केंद्राला भेट द्यावी लागत असे.

आता मात्र हा दृष्टिकोन बदलतो आहे. बायोमेट्रिक तपशील अद्यतन प्रलंबित असलेल्या अशा बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील MBU उपक्रम  शाळांचा वापर करत आहे. UIDAI आणि शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने UDISE+ प्लॅटफॉर्मद्वारे MBU-स्थितीची माहिती उपलब्ध करून दिली आहे. राज्यांना शाळांमध्ये MBU शिबिरे आयोजित करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते आहे.

हा खऱ्या अर्थाने नागरिक-स्नेही दृष्टिकोन आहे. बालकाचे आधार तपशील अद्ययावत करण्याची वेळ आली आहे, हे पालकांना कळवण्याची वाट पाहण्याऐवजी, ही प्रणाली संबंधित शाळांपर्यंत पोहोचते. संबंधित शाळा पालकांना माहिती देण्यास आणि प्रक्रियेअंतर्गत समन्वय साधण्यास मदत करू शकतात, आणि शिबिरांच्या माध्यमातून आधार अद्यतन सेवा बालकांच्या अधिक जवळ आणल्या जाऊ शकतात.

## पथदर्शी दृष्टिकोन

महाराष्ट्राच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता संचालनालयाने बालकांच्या प्रलंबित आधार नोंदींचे काम पूर्ण करण्यासाठी ही समन्वित मोहिम हाती घेतली आहे. राज्याच्या जिल्हास्तरीय कृती आराखड्यानुसार, आधार स्रोत आणि मोबाईल सेवा क्षमतेचा समन्वित वापर करण्याचे उद्दिष्ट आहे, ज्यामध्ये जिल्हाधिकारी हे नियोजन आणि अंमलबजावणीत मध्यवर्ती भूमिका बजावतील. शालेय स्तरावरील ओळख, क्षेत्रीय स्तरावरील समन्वय आणि सातत्यपूर्ण देखरेख हे या मोहिमेचे मुख्य घटक आहेत.

याचे महत्त्व केवळ मोहिमेपुरते मर्यादित नाही, तर ज्या प्रकारे ही मोहीम शासनाच्या विविध विभागांना एका समान सेवा-वितरण चौकटीत आणते, ते सुद्धा महत्वाचे आहे.

शालेय शिक्षण विभागाला पायाभूत सुविधा पुरवून, जिल्हा प्रशासन आणि आधार पथकांशी समन्वय साधून, अद्यतने प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांना ओळखण्यास मदत करून तसेच बालके आणि पालकांना माहिती देऊन एमबीयू शिबिरांना सहकार्य देण्यास सांगण्यात आले आहे.

महिला आणि बाल विकास विभागालाही त्यांचे व्यापक क्षेत्रीय जाळे आणि आधार-संबंधी पायाभूत सुविधांच्या माध्यमातून या प्रयत्नात सामील करून घेतले जात आहे. यात उपलब्ध एमबीयू संचांचे वितरण तसेच लाभार्थी संघटन आणि जनजागृतीसाठी सहाय्याचा समावेश आहे. हा केवळ विभागीय समन्वय नाही, तर पात्र लाभार्थी नागरिकांचे एकत्रीकरण आहे.

शाळांकडे सामान्यत: शिक्षणाची ठिकाणे म्हणून पाहिले जाते. मात्र डिजिटल पद्धतीने जोडलेल्या शासन प्रणालीमध्ये, त्या शासकीय सेवा प्रदान करण्याचे महत्त्वाचे केंद्र देखील बनू शकतात. बालके शाळांमध्ये शिकण्यासाठी येतात, शिक्षक आणि प्रशासक पालकांशी नियमितपणे संवाद साधतात आणि शिक्षण प्रणालीचे जिल्हा व तालुका स्तरावर एक मजबूत जाळे असतेच. त्यामुळे आवश्यक डिजिटल सेवा कुटुंबांच्या जवळ पोहोचवण्यासाठी शाळा हे एक नैसर्गिक व्यासपीठ ठरते.

हे विद्यमान जाळे डिजिटल ओळख अधिक प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यास कशी मदत करू शकते, हे या एमबीयू उपक्रमावरून दिसून येते. एखादी शासकीय सेवा नागरिकांच्या विशिष्ट गटासाठी असते, तेव्हा त्या गटासोबत आधीपासूनच जवळून काम करणाऱ्या संस्था ती सेवा पोहोचवण्यासाठी मौल्यवान भागीदार बनू शकतात.

बायोमेट्रिक अद्यतन हे एक किरकोळ प्रशासकीय काम वाटू शकते, परंतु ते वेळेत होणे महत्त्वाचे असते. विलंब  झाल्यास शासकीय लाभ, शिष्यवृत्ती, परीक्षा किंवा इतर सेवांसाठी आधार प्रमाणीकरणात समस्या निर्माण होऊ शकतात. एखाद्या विद्यार्थ्यासाठी परीक्षा, प्रवेश किंवा शिष्यवृत्ती प्रक्रियेच्या अगदी आधी अशा समस्येचा सामना करणे तणावाचे असू शकते.

वेळेत माहिती अद्ययावत करणे, हा यावर उत्तम उपाय होय. या दृष्टीने MBU मोहीम महत्त्वाची आहे.

## अद्ययावत डिजिटल ओळख

बालकाच्या आयुष्याच्या प्रवासात शाळा, शिष्यवृत्ती, परीक्षा, उच्च शिक्षण आणि शासकीय सेवांचा लाभ असे अनेक टप्पे असतात. बालकाची विश्वसनीय डिजिटल ओळख प्रत्येक टप्प्यावरील प्रक्रिया सुलभ करू शकते. ओळख प्रणाली सुरळीतपणे काम करते, तेव्हा लोकांच्या ते सहसा लक्षात येत नाही. परंतु जेव्हा ती एखाद्या महत्त्वाच्या क्षणी अयशस्वी होते, तेव्हा गंभीर समस्या उद्भवू शकते.

त्यामुळे एमबीयू म्हणजे केवळ बोटांचे ठसे, डोळ्यांची बाहुली किंवा छायाचित्रे अद्ययावत करणे नव्हे. कालबाह्य झालेली बायोमेट्रिक नोंद भविष्यात मुलासाठी अडथळा ठरू नये, याची खातरजमा करण्याच्या दृष्टीने हे अद्यतन सहायक ठरते.

भारताच्या विस्तारत असलेल्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या पार्श्वभूमीवर एमबीयूचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. भारताची डिजिटल प्रशासकीय रचना अधिक विश्वसनीय ओळख, प्रमाणीकरण आणि आंतरकार्यक्षम मंचांवर अवलंबून आहे. जिथे आधारचे तपशील वापरले जातात, तिथे त्या व्यक्तीची ओळख महत्त्वाची बाब ठरते.

त्यामुळे ओळख पटवणाऱ्या अशा डेटाची गुणवत्ता महत्त्वाची ठरते. विश्वसनीय ओळख प्रणालीसाठी निव्वळ नोंदणीऐवजी ओळख व्यवस्थापनाची आवश्यकता असते. एमबीयू हा अशाच व्यवस्थापनाचा एक भाग आहे. हे अभियान डिजिटल प्रशासनाचे एक महत्त्वाचे तत्त्व ओळखते: ओळख एकदा तयार करून विसरणे योग्य नाही, ती तिच्या उद्देशपूर्तीसाठी अद्ययावत राहिली पाहिजे.

शासनाला डिजिटल सेवांचा अनुशेष कशा प्रकारे हाताळता येईल, याचे हे उत्तम उदाहरण आहे. केवळ प्रलंबित प्रकरणे शोधून ती निकाली

काढण्याऐवजी, हा अनुशेष का निर्माण झाला हे समजून घेणे, अशी प्रकरणे लवकर ओळखणे, नागरिकांना माहिती देणे, विद्यमान संस्थांचा वापर करणे आणि प्रगतीवर सतत लक्ष ठेवणे हा एक सकारात्मक दृष्टिकोन आहे.

पारंपारिक शासकीय सेवा अनेकदा नागरिकांच्या पुढाकारावर अवलंबून असतात. त्यांना गरज लक्षात घ्यावी लागते, सेवा शोधावी लागते, कार्यालयात जावे लागते, कागदपत्रे सादर करावी लागतात आणि पाठपुरावा करावा लागतो. डिजिटल प्रशासन ही प्रक्रिया बदलू शकते. ही प्रणाली गरज ओळखू शकते, नागरिकाला माहिती देऊ शकते, त्यांना योग्य सेवा प्राप्त करण्यासाठी मार्गदर्शन करू शकते, सेवा त्यांच्या घराजवळ आणू शकते आणि ती प्राप्त होईपर्यंत मागोवा घेऊ शकते. समस्या गंभीर होण्यापूर्वीच तिचे निराकरण करणे, हे यामागचे ध्येय आहे.

महाराष्ट्राची एमबीयू मोहीम विविध विभागांना एकत्र आणते आहे. महाराष्ट्राचे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता संचालनालय, तंत्रज्ञान आणि समन्वय प्रदान करते. जिल्हा प्रशासन अंमलबजावणीचे नेतृत्व करते, शिक्षण यंत्रणा विद्यार्थी आणि शाळांशी संपर्क साधते, महिला व बाल विकास विभाग आपले क्षेत्रीय जाळे पुरवतो आणि यूआयडीएआय आधार आराखडा तसेच मानके पुरवते. शाळा प्रणालीला पालकांशी जोडण्यास मदत करतात, तर कुटुंबे केंद्रस्थानी राहतात. कोणताही एक विभाग हे एकट्याने साध्य करू शकत नाही. नागरिकांच्या स्तरावरील समस्या सोडवण्यासाठी हा शासनाचा परिपूर्ण असा दृष्टिकोन आहे.

तंत्रज्ञानाला प्रलंबित असणारी अद्यतने ओळखता येतात, डॅशबोर्ड तयार करता येतात, माहिती सामायिक करता येते आणि प्रमाणीकरणास समर्थनसुद्धा देता येते. मात्र एकटे तंत्रज्ञान नागरिकांचा हा प्रवास पूर्ण करू शकत नाही. कोणीतरी पालकांना माहिती दिली पाहिजे, शाळेसोबत समन्वय साधला पाहिजे, उपकरणे आणि कनेक्टिव्हिटी सुनिश्चित केली पाहिजे आणि मुलाला प्रत्यक्षात सेवा मिळेल याची खात्री केली पाहिजे. म्हणूनच यशस्वी डिजिटल प्रशासन केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित नाही. हे तंत्रज्ञान + संस्था + लोक + प्रक्रिया यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे.

एखादी प्रणाली नागरिकाला लागू असणारी प्रलंबित सेवा ओळखू लागली, आणि त्यानुसार कार्यवाही करू लागली की तिचा वापर निव्वळ बायोमेट्रिक अद्यतनाच्या पलीकडे जाऊ शकतो. अशा शासकीय प्रणाली भविष्यात नागरिकांच्या महत्त्वाच्या गरजा समस्या बनण्यापूर्वीच ओळखू शकतील. विद्यार्थ्यांना शिक्षण-संबंधित गरजांबद्दल वेळेवर स्मरणपत्रे मिळू शकतील, लाभार्थ्यांना नूतनीकरणाची आठवण करून दिली जाऊ शकेल आणि महत्त्वाच्या कागदपत्रांमध्ये बदल करण्याची गरज असताना नागरिकांना मार्गदर्शन मिळू शकेल.

शाळा अनेक डिजिटल सेवांसाठी स्थानिक संपर्क केंद्र बनू शकतील. जिल्हा डॅशबोर्ड केवळ समस्या कुठे निर्माण झाल्या आहेत हे दाखवण्याऐवजी, सेवांची गरज कुठे लागण्याची शक्यता आहे हे दाखवू शकतील, आणि डिजिटल प्रशासन केवळ प्रक्रियांचे डिजिटायझेशन न करता, नागरिकांच्या गरजांचा अंदाज घेत प्रशासकीय बुद्धिमत्तेच्या दिशेने वाटचाल करू लागेल.

## डिजिटल ओळखीची मानवी बाजू

प्रत्येक आधार क्रमांकामागे एक व्यक्ती असते. एमबीयूच्या बाबतीत, ती व्यक्ती म्हणजे एक बालक आहे. या शिबिरांचा लाभ घेणाऱ्या सर्व बालकांचे अद्ययावत झालेले आधार तपशील त्यांना शिक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ घेण्याच्या कामी उपयुक्त ठरतील.

पालकांच्या दृष्टीने कदाचित ही शिबिरे प्रशासकीय कामकाजाचा भाग असतील, लाभार्थी बालकांच्या दृष्टीने मात्र हा एका मोठ्या डिजिटल प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग आहे, आणि पायाभूत सुविधांइतकीच त्याबाबतची जागरूकताही महत्त्वाची आहे. या अद्यतनाचे महत्त्व पालकांनी समजून घेतले पाहिजे आणि ही प्रक्रिया सोपी, सुलभ आणि तणावमुक्त असली पाहिजे.

शैक्षणिक प्रवेश, परीक्षा किंवा शिष्यवृत्ती अर्जांच्या वेळी आधार अद्यतन प्रलंबित असणे, हे ती संधी गमावण्यास कारणीभूत ठरू शकते. अशी परिस्थिती टाळण्यासाठी आधार अद्यतनासारखी डिजिटल सज्जता अतिशय महत्वाची असते.

एकंदर शासकीय प्रणालीने ही गरज लवकर ओळखली पाहिजे. पालक, शाळा आणि जिल्हा प्रशासनांना याची जाणीव असली पाहिजे आणि आवश्यकतेनुसार ही सेवा उपलब्ध असली पाहिजे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातील परिपक्व डिजिटल प्रशासन प्रणालीने हे उद्दिष्ट साध्य करण्याचे ध्येय बाळगले पाहिजे.

अशा प्रकारच्या पथदर्शी योजना लोकोपयुक्त सेवा निर्धारित कालावधीत देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विविध संस्थांना एकत्र आणतात. मात्र कालानुरूप अशा मोहिमांची गरज कमी करणे हे दीर्घकालीन ध्येय असले पाहिजे. एमबीयू अभियानाच्या संदर्भात बोलायचे झाले तर शासकीय प्रणालीने पात्र बालकांच्या अथवा विद्यार्थ्यांच्या आधार अद्यतनाचा मागोवा सातत्याने घेतला पाहिजे, संबंधितांना वेळेवर स्मरणपत्रे पाठवली पाहिजेत आणि प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढण्यापूर्वी शाळा आणि कुटुंबांना अद्ययतन पूर्ण करण्यास मदत केली पाहिजे.

आजचे अभियान उद्याच्या प्रणालीची प्रेरणा असू शकते. एमबीयू सारख्या मोहिमेकडून निरंतर सज्जतेच्या दिशेने होणारे हे स्थित्यंतर, महाराष्ट्रातील नागरिकांसाठी वरदान ठरते आहे. या अभियानाची कहाणी बायोमेट्रिक्सने सुरू होते, आणि डिजिटल भारतात वाढणाऱ्या बालकाच्या भवितव्याभोवती फिरत राहते. बालक मोठे होईल, तसतशी त्याची डिजिटल ओळख अचूक राहील, याची खातरजमा करणे, हे यामागचे उद्दिष्ट आहे.



# सायबर सुरक्षा



## एआय आणि क्वांटम युगासाठी शासकीय नेतृत्वाची सज्जता

2 सप्टेंबर रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात "सायबर सुरक्षा आणि संबंधित बाबी" या विषयावर एका उच्चस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सायबर सुरक्षा, डेटा संरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) आणि क्वांटम-पश्चात सज्जतेच्या वेगाने बदलणाऱ्या भविष्याचा आढावा घेण्यासाठी या कार्यशाळेत वरिष्ठ आयएएस अधिकारी आणि तंत्रज्ञान तज्ञ एकत्र आले. डिजिटल तंत्रज्ञान शासनाला आणि सार्वजनिक सेवा वितरणाला आकार देत असल्यामुळे, महाराष्ट्रासाठी एक सुरक्षित, लवचिक आणि भविष्य-सज्ज डिजिटल परिसंस्था तयार करण्यासाठी, वाढते सायबर धोके आणि धोरणांबाबत विचारविनिमय करण्यासाठी या कार्यशाळेने एक महत्त्वाचा मंच उपलब्ध करून दिला.

महाराष्ट्रात शासनाच्या डिजिटलीकरणामुळे शासनाने नागरिकांशी संवाद साधण्याची, सेवा देण्याची आणि सार्वजनिक पायाभूत सुविधांचे व्यवस्थापन करण्याची पद्धत बदलली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आता निर्णय-प्रणालींमध्ये प्रवेश करत आहे, डिजिटल मंचांद्वारे मोठ्या प्रमाणात डेटावर प्रक्रिया केली जाते आहे, आणि काही वर्षांपूर्वी कल्पनाही करता येत नव्हती, अशा संधी उदयोन्मुख तंत्रज्ञान निर्माण करत आहे.

मात्र हे परिवर्तन अनेक धोकेसुद्धा निर्माण करत आहे. सायबर फसवणूक, डेटा चोरी, एआय-सक्षम हल्ले आणि क्वांटम कंप्युटिंगचा वाढता धोका जगभरातील सरकारांना सायबर सुरक्षेबाबत पुनर्विचार करण्यास भाग पाडत आहेत. झपाट्याने बदलणाऱ्या या वातावरणासाठी नेतृत्व तयार करण्याचे महत्त्व लक्षात घेत महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने, महाराष्ट्र शासनाच्या वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांसाठी "सायबर सुरक्षा आणि संबंधित बाबी" या विषयावर एका उच्चस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले.

या कार्यशाळेत प्रशासकीय नेतृत्व आणि तंत्रज्ञान तज्ञांना एकत्र आणून डीपीडीपी-प्रणित डेटा सुरक्षा, पोस्ट-क्वांटम क्रिप्टोग्राफी, नेक्स्ट जनरेशन एआय सुरक्षा अशा डिजिटल प्रशासनाचे भविष्य घडवणाऱ्या काही अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

### सायबर सुरक्षा - आर्थिक सुरक्षेसाठी एक अत्यावश्यक गरज

कार्यशाळेला संबोधित करताना, महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव श्री. विरेंद्र सिंह यांनी, सायबर गुन्हेगारीचे वाढते प्रमाण आणि त्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानाबाबत चर्चा केली.




"सायबर फसवणूक आणि सायबर गुन्हेगारीमुळे मोठे आर्थिक नुकसान होत असून त्यामुळे शासन, उद्योग आणि नागरिकांसाठी गंभीर आव्हान निर्माण झाले आहे. आपली अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक सेवा अधिकाधिक डिजिटल होत असल्याने, सायबर सुरक्षेला आपल्या डिजिटल परिसंस्थेचा एक मूलभूत आधारस्तंभ मानले पाहिजे," असे ते म्हणाले.

श्री. सिंह यांनी जबाबदार डेटा व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी आणि जनतेमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण आराखड्याचे महत्त्व अधोरेखित केले. हे आव्हान महाराष्ट्रासाठी विशेष महत्त्वाचे आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे डिजिटल आणि आर्थिक पायाभूत सुविधांचे संरक्षण करणे जास्त महत्वाचे ठरते. त्यामुळे आपल्या डिजिटल आणि आर्थिक पायाभूत सुविधांचे संरक्षण करणे हा केवळ तंत्रज्ञानाचा प्रश्न नाही, तो आर्थिक सुरक्षेचा प्रश्न आहे. हा दृष्टिकोन सायबर सुरक्षेच्या विचारांमधील एक महत्त्वपूर्ण उत्क्रांती दर्शवितो. सायबर सुरक्षा आता केवळ माहिती तंत्रज्ञान विभाग किंवा तांत्रिक संघटनांपुरती मर्यादित राहिलेली नाही. तो आता सुशासन, संस्थात्मक लवचिकता, आर्थिक स्थिरता आणि जनतेच्या विश्वासाचा प्रश्न बनला आहे, असे निरीक्षण श्री. सिंह यांनी नोंदवले.

### क्वांटम धोका: भविष्यासाठी पूर्वतयारी

'क्वांटम-पश्चात क्रिप्टोग्राफी'या विषयावर या कार्यशाळेत प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.

आजच्या काळात डिजिटल पायाभूत सुविधा बहुतांशी पारंपरिक एन्क्रिप्शन प्रणालींवर अवलंबून आहेत. या प्रणाली संवेदनशील माहिती, आर्थिक व्यवहार, शासकीय संवाद आणि डिजिटल ओळख यांचे संरक्षण करतात. मात्र शक्तिशाली क्वांटम संगणकीय क्षमतांच्या भविष्यातील विकसनामुळे सध्याच्या क्रिप्टोग्राफिक प्रणालींना मूलभूत आव्हान मिळू शकते. श्री वीरेंद्र सिंग यांनी 'आता संकलित करा, नंतर डिक्रिप्ट करा' (Harvest Now, Decrypt Later) या धोक्याबद्दल विशेषत्वाने प्रकाश टाकला.

या संकल्पनेनुसार संगणकीय क्षमता विकसित होतील, तसतशी एन्क्रिप्ट केलेली माहिती वर्तमानात संकलित गोळा करून भविष्यात डिक्रिप्शनच्या प्रयत्नांसाठी संग्रहित केली जाऊ शकते. 'क्वांटम-पश्चात सज्जतेसाठी संस्थांना त्यांचे क्रिप्टोग्राफिक अवलंबित्व समजून घेणे, दीर्घकालीन संरक्षणाची आवश्यकता असलेली संवेदनशील माहिती ओळखणे आणि क्वांटम-प्रतिरोधक सुरक्षेकडे भविष्यातील संक्रमणासाठी धोरणे विकसित करणे आवश्यक असेल.

## सायबर सुरक्षेची नवी आघाडी

कृत्रिम बुद्धिमत्ता सायबर सुरक्षेच्या समीकरणाच्या दोन्ही बाजू वेगाने बदलत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता संस्थांना धोके शोधण्यात, असुरक्षितता ओळखण्यात आणि सुरक्षा कार्यांचा वेग सुधारण्यात मदत करू शकते. त्याच वेळी, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे या प्रणालींच्या सुरक्षितता, विश्वसनीयता आणि प्रशासनाबद्दलही नवीन प्रश्न निर्माण होत आहेत. या कार्यशाळेत 'नेक्स्ट जनरेशन एआय सिक्युरिटी ऑपरेशन्स सेंटर्स' आणि 'एआय-आधारित भेद्यता शोध' यांच्या भूमिकेवर चर्चा करण्यात आली. या चर्चेतून भविष्यासाठी एक मूलभूत आव्हान अधोरेखित झाले: ते म्हणजे सायबर सुरक्षा मजबूत करण्यासाठी एआयचा वापर केला पाहिजे, त्याचबरोबर एआय प्रणालींनाही सुरक्षित ठेवले पाहिजे आणि त्यांचे जबाबदारीने प्रशासन केले पाहिजे. एआय प्रणाली सार्वजनिक सेवा, प्रशासकीय प्रक्रिया आणि निर्णयप्रक्रियेला अधिकाधिक साहाय्य करू शकतात.

हे विशेषतः सरकारांसाठी महत्त्वाचे आहे, जिथे एआय प्रणाली सार्वजनिक सेवा, प्रशासकीय प्रक्रिया आणि निर्णय प्रक्रियेला अधिकाधिक साहाय्य करू शकतात.

## विश्वासाची भावना एआय प्रशासनाच्या केंद्रस्थानी

जबाबदार एआय प्रशासन आणि डेटा गोपनीयतेच्या वाढत्या महत्त्वावरही या कार्यशाळेत लक्ष केंद्रित करण्यात आले. शासकीय निर्णय प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता समाविष्ट होत असताना नवोन्मेष हे केवळ उद्दिष्ट असू शकत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित प्रणालींनी योग्य जबाबदारी, पारदर्शकता आणि सुरक्षा उपायांसह कार्य केले पाहिजे. मोठ्या प्रमाणावर संवेदनशील वैयक्तिक माहिती हाताळणाऱ्या शासकीय संस्थांच्या दृष्टीने डेटा गोपनीयता हा डिजिटल परिवर्तनाचा पाया असतो. डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा 2023, वैयक्तिक डेटा कसा गोळा केला जातो, त्यावर प्रक्रिया केली जाते, त्याचे संरक्षण केले जाते आणि तो कसा नियंत्रित केला जातो, हे तपासण्यासाठी संस्थांना एक महत्त्वाची चौकट प्रदान करतो. नवोन्मेष आणि गोपनीयता एकत्रितपणे पुढे जातील याची खातरजमा करणे हे एक नवीन आव्हान आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात, विश्वास हा शाश्वत डिजिटल परिवर्तनाच्या सर्वात महत्त्वाच्या पायांपैकी एक बनण्याची शक्यता आहे.

## एआय हमी: प्रयोगापासून प्रशासनाकडे वाटचाल

डेलॉइट दक्षिण आशियाचे चीफ डिसरप्शन ऑफिसर डॉ. जगदीश भांडारकर आणि डेलॉइट इंडियाच्या पार्टनर नम्रता राव यांनी एआय हमीबाबत आपले मत व्यक्त केले. "संस्था कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत प्रयोग करण्यापासून ते मोठ्या प्रमाणावर त्याचा वापर करण्यापर्यंत वेगाने वाटचाल करत असताना, एआय हमी हा प्रशासकीय चौकटीचा एक मुख्य भाग असला पाहिजे. पायाभूत हमीपासून सुरू झालेला हा प्रवास कठोर चाचणी, रेड टीमिंग, गार्डरेल्स आणि मॉडेल व्हॅलिडेशन, आणि नंतर संरचित प्रशासन, जोखीम आणि अनुपालनाच्या दिशेने प्रगती करतो."

"भविष्यात एआय प्रणालींचे निरीक्षण करण्यास, एआय मालमत्ता आणि जोखीम नोंदणी राखण्यास, आणि सतत हमी प्रदान करण्यास सक्षम असलेल्या उपक्रम-व्याप्त एआय हमी मंचांची आवश्यकता असेल. सुरक्षित एआय अवलंबनाला गती देणे, नियामकांचा विश्वास वाढवणे आणि मोजमापयोग्य, समर्थनीय एआय वैविध्य निर्माण करणे, हे यामागचे उद्दिष्ट आहे."

## सायबर सुरक्षेचे भविष्य: लवचिकता आणि एकात्मता

सायबर सुरक्षेचे वातावरण दिवसेंदिवस गुंतागुंतीचे आणि अस्थिर होत आहे. संस्था त्यांच्या सुरक्षा परिसंस्थेमध्ये अधिक मजबूत एकात्मता साधून आणि नव्याने उद्भवणाऱ्या धोक्यांना तोंड देण्यास सक्षम धोरणात्मक क्षमता निर्माण करून याला प्रतिसाद देत आहेत. सायबर सुरक्षेचे भविष्य हे केवळ तंत्रज्ञान उपायांवर अवलंबून न राहता, लवचिक आणि एकात्मिक परिसंस्था निर्माण करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल.

शासनाच्या संदर्भात याचा अर्थ तंत्रज्ञान, प्रक्रिया, मनुष्यबळ आणि नेतृत्व यांचा समावेश असलेली एक संस्थात्मक क्षमता म्हणून सायबर सुरक्षेचा विकास करणे, असा आहे. ही कार्यशाळा वाढत्या डिजिटल जगात संस्थात्मक क्षमता बळकट करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या व्यापक वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

महाराष्ट्र आपली डिजिटल प्रशासकीय परिसंस्था विस्तारत असताना आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत असताना, सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि नागरिकांचा विश्वास जपण्यासाठी सायबर सुरक्षेची सज्जता महत्त्वाची ठरणार आहे. या कार्यशाळेने, उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या युगात केवळ उपलब्ध सुरक्षा रचनेच्या बळावर भविष्यातील धोक्यांना तोंड देता येणार नाही, या गंभीर



वास्तवावर प्रकाश टाकला.

भविष्यासाठी सज्ज होताना नेतृत्वाची जागरूकता, संस्थात्मक क्षमता, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने स्वीकार आणि संपूर्ण सरकारमध्ये सायबर सुरक्षेची एक मजबूत संस्कृती आवश्यक असेल. वरिष्ठ प्रशासकीय नेतृत्वाला सायबर सुरक्षा, डेटा संरक्षण, एआय प्रशासन आणि क्वांटम-युगाच्या सज्जतेमधील तज्ञांसोबत एकत्र आणून, अधिक सुरक्षित, लवचिक आणि भविष्यासाठी सज्ज अशी डिजिटल परिसंस्था तयार करण्याच्या दिशेने महाराष्ट्र राज्य एक महत्त्वाचे पाऊल उचलत आहे.

या कार्यशाळेने महाराष्ट्राच्या विकसित होत असलेल्या डिजिटल परिसंस्थेसाठी अनेक मुख्य प्राधान्यक्रम अधोरेखित केले. सायबर सुरक्षा ही आता केवळ एक तांत्रिक जबाबदारी राहिली नसून ती प्रशासन, आर्थिक सुरक्षा आणि सार्वजनिक विश्वासाचा महत्वाचा मुद्दा ठरली आहे. या कार्यशाळेतील चर्चेत 'प्रायव्हसी बाय डिझाइन' आणि जबाबदार डेटा व्यवस्थापन या बाबींना डिजिटल प्रणालींमध्ये समाविष्ट करण्याच्या महत्त्वावर भर देण्यात आला, विशेषतः भारताची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचे स्थान लक्षात घेता, या शहराच्या डिजिटल आणि आर्थिक पायाभूत संरचनेचे संरक्षण करणे हे राष्ट्रीय महत्त्वाचे ठरते.

'आता संकलित करा, नंतर डिक्रिप्ट करा' (Harvest Now, Decrypt Later) या संभाव्य धोक्याने क्वांटम-पश्चात युगासाठी तयारी सुरू करण्याची गरज अधोरेखित केली. त्याच वेळी, एआय-सक्षम सुरक्षा परिचालन केंद्रे आणि असुरक्षितता शोध महत्त्वपूर्ण कार्य करत असले तरी, एआय प्रणाली सुरक्षित, विश्वासार्ह असणे आणि त्यांना मजबूत प्रशासन व हमी चौकटींचा आधार असणे आवश्यक आहे. नागरिकांचा विश्वास निर्माण करण्यासाठी आणि डिजिटल परिवर्तनाचा पुढील टप्पा निश्चित करण्यासाठी डेटा गोपनीयता, जबाबदार एआय आणि सायबर सुरक्षा हे केंद्रस्थानी असतील, यावर या कार्यशाळेने प्रामुख्याने भर दिला.



# शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोच



## पारनेर तालुक्यातील आपले सरकार सेवा केंद्र घडवते आहे नागरिक सेवांमध्ये परिवर्तन

शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध आहेत, मात्र नागरिकांना त्या सहजपणे, स्थानिक पातळीवर आणि विना-विलंब मिळू शकतील, याची खातरजमा करण्यासाठी सेवा प्रदान करणाऱ्यांची वचनबद्धता महत्वाची आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात, सुपा येथील 'आपले सरकार सेवा केंद्रा'चे संचालक श्री. राजू पांडुरंग ढवळे यांनी तब्बल एक दशकापेक्षा जास्त काळ ही दरी भरुन काढण्याचे काम केले आहे.

वाणिज्य आणि आयटीआय शिक्षणाची पार्श्वभूमी असलेले राजू ढवळे यांनी सुमारे 15 वर्षे एका सहकारी पतसंस्थेत काम केले, जिथे त्यांनी दैनंदिन सेवांसाठी शासकीय कार्यालयापर्यंत प्रवास करताना नागरिकांना येणाऱ्या अडचणी जवळून पाहिल्या. या सेवा लोकांना अधिक सुलभरित्या साध्य करण्याच्या इच्छेने प्रेरित होऊन, त्यांनी 2013 साली एक व्यवसाय म्हणून नव्हे, तर एक नागरिक-सेवा उपक्रम म्हणून सुपा येथे 'महा ई-सेवा केंद्र' सुरु केले.

सुरुवातीला अनेक गावांमधील रहिवाशांना वेगवेगळ्या शासकीय कामांसाठी पारनेरपर्यंत प्रवास करावा लागत होता. वेळेवर, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा देणाऱ्या या केंद्राने हळूहळू नागरिकांचा विश्वास संपादन केला. 2014 सालापर्यंत आसपासच्या परिसरातील जवळपास 30 गावे या केंद्राशी जोडली गेली होती.

2015 साली या केंद्राला आधार नोंदणी संच मिळाला, तेव्हा एका नव्या टप्प्याला सुरुवात झाली. त्यावेळी पारनेर तालुक्यात आधार नोंदणीचे प्रमाण 50 टक्क्यांपेक्षा कमी होते. श्री. ढवळे आणि तीन ते पाच परिचालकांच्या टीमने अंगणवाड्या, शाळा, ग्रामपंचायती आणि मंदिरांमध्ये नोंदणी आणि अद्यतन शिबिरे आयोजित केली. चांगले रस्ते उपलब्ध नसलेल्या दुर्गम गावांमध्येही, या टीमने मोटरसायकलवरून आधारची उपकरणे पोहोचवली. महाआयटी अधिकारी, सीएससी समन्वयक, स्थानिक महसूल अधिकारी आणि गावपातळीवरील अधिकाऱ्यांच्या सहकार्याने, जवळपास तीन वर्षांत सुमारे 50,000 आधार नोंदण्या, अद्यतन आणि दुरुस्त्या पूर्ण करण्यात आल्या.

सुपा एमआयडीसी परिसरातील लहान व्यवसायांसाठी हे केंद्र, एक महत्त्वाची आधारप्रणाली बनले आहे. हे केंद्र उद्योजकांना उद्यम नोंदणी, दुकाने आणि आस्थापना नोंदणी, अन्न परवाने आणि शासकीय योजना व पतपुरवठा सुविधा मिळवून देण्यासाठी मदत करते.

2022 साली एका विद्यार्थ्याला अभियांत्रिकी प्रवेशासाठी उत्पन्न, अधिवास आणि नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्रांची तातडीने आवश्यकता होती. ढवळे यांनी तलाठी कार्यालयासोबत समन्वय साधून, अवघ्या तीन दिवसांत ही कागदपत्रे उपलब्ध करून दिली. त्या विद्यार्थ्याने आज अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले असून तो सुमारे 10 लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेजवर काम करत आहे.

श्री. ढवळे यांची ही बांधिलकी केवळ त्यांच्या केंद्रापुरती मर्यादित नाही. एका प्रकरणात त्यांनी अपघातग्रस्ताच्या कुटुंबाला आयुष्मान भारत योजनेची केवायसी पूर्ण करण्यासाठी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना तसेच मुख्यमंत्री मदत निधीसाठी आवश्यक असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळवून देण्यास मदत करण्यासाठी स्वतः रुग्णालयाला भेट दिली.

ढवळे यांच्या केंद्रामार्फत विद्यार्थी आणि पालकांना व्हॉट्सअॅपद्वारे नियमितपणे मार्गदर्शन केले जाते, महिलांना पीएम विश्वकर्मा, ई-श्रम, पॅन आणि स्वयं-सहायता गट-संबंधित सेवांसाठी मदत मिळते, तसेच ज्येष्ठ नागरिकांना जीवन प्रमाणसाठी घरपोच मदत दिली जाते. केंद्रापर्यंत प्रवास करू न शकणाऱ्या नागरिकांना शक्य असेल तेव्हा घरपोच मदत केली जाते.

आजघडीला श्री. ढवळे आणि त्यांची चार सदस्यीय टीम दररोज 500 पेक्षा जास्त नागरिकांना सेवा प्रदान करते. "नागरिकांचे काम अचूकपणे, कमीत कमी वेळेत आणि कमीत कमी भेटींमध्ये पूर्ण करावे", हे त्यांचे मार्गदर्शक तत्त्व आहे.

डिजिटल प्रशासनाची खरी ताकद केवळ सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात नाही, तर नागरिकांचे दैनंदिन जीवन सुधारण्यासाठी तंत्रज्ञान, प्रशासन आणि स्थानिक सेवा वितरणाचा योग्य समन्वय साधण्यात आहे. तळागाळातील सेवा केंद्रे डिजिटल महाराष्ट्राला कशा प्रकारे अधिक सुलभ, सर्वसमावेशक आणि नागरिक-केंद्रित बनवू शकतात, याचे, श्री. राजू पांडुरंग ढवळे हे एक प्रभावी उदाहरण आहे.



# विश्वासापासून परिवर्तनापर्यंत



## पाथर्डी तालुक्यात डिजिटल सक्षमीकरणाचा आणि विश्वासार्ह प्रशासनाचा प्रवास

पाथर्डी तालुक्यातील सेतू कार्यालय आणि आपले सरकार सेवा केंद्राचे परिचालक श्री. बाबासाहेब विठ्ठल चौधरी यांच्या मते या केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांची सेवा करण्याचा प्रवास ही केवळ एक व्यावसायिक जबाबदारी नाही. गेल्या 15 वर्षांपासून, विश्वास, सुलभता आणि लोकांना शासकीय सेवांचा लाभ घेण्यास मदत करण्याच्या दृढ वचनबद्धतेवर आधारित असे हे एक अभियान आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये हे केंद्र ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आधारस्थान बनले आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रे आणि ऑनलाइन अर्जांसाठी मदत मिळते. विधवा आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ कुटुंबांतील महिलांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि आवश्यक औपचारिकता पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. शेतकऱ्यांना ऑनलाइन सेवा, प्रमाणपत्रे आणि शासकीय अर्जांसाठी मदत मिळते, तर ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या विशिष्ट गरजांनुसार शासकीय लाभ प्राप्त करण्यासाठी साहाय्य केले जाते.

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांसाठी डिजिटल स्वरूपातील शासकीय सेवांचा लाभ घेणे आजही आव्हानात्मक असू शकते. ऑनलाइन प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि शासकीय पोर्टल्स यांची माहिती मर्यादित असल्यामुळे, अनेकदा एक साधा अर्ज करणेही कठीण वाटू शकते. त्यामुळे श्री. चौधरी यांनी नागरिकांना केवळ डिजिटल मंच उपलब्ध करून देण्यावरच नव्हे, तर वाजवी दरात पारदर्शक सेवा, वैयक्तिक मार्गदर्शन आणि सहाय्य प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

प्रत्येक नागरिकाने प्रक्रिया समजून घेतली पाहिजे, कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत हे जाणून घेतले पाहिजे आणि कोणत्याही अनावश्यक अडचणीशिवाय सेवा प्राप्त केली पाहिजे, असे त्यांचे मत आहे. 15 वर्षांपेक्षा जास्त काळ परिचालक म्हणून काम करताना असंख्य लहान-सहान क्षणांमुळे त्यांचा हा प्रवास अर्थपूर्ण ठरला आहे. शाळा-महाविद्यालयीन प्रवेशाच्या अंतिम मुदतीपूर्वी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण दस्तऐवज प्राप्त होणे, शेतकऱ्याला आवश्यक असणारी प्रमाणपत्रे प्राप्त होणे, ज्येष्ठ नागरिकांना वारंवार फेऱ्या मारायला न लावता शासकीय प्रक्रिया पूर्ण करणे, किंवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ यशस्वीपणे प्राप्त होणे, अशा प्रत्येक परिणामाने त्यांच्या कामामागील उद्देश अधिक दृढ केला आहे.

पाथर्डी तालुक्यातील लोकांचा विश्वास ही त्यांची सर्वात मोठी कमाई आहे. तंत्रज्ञान विकसित झाले आणि अधिकाधिक शासकीय सेवा ऑनलाइन आल्या, तसतशी स्थानिक सेवा केंद्रांची भूमिकाही बदलली आहे. मात्र या प्रक्रियेत, नागरिकांना व्यवस्थेबाबत मार्गदर्शन करणाऱ्या विश्वासार्ह व्यक्तीची मुलभूत गरज कायम राहिली आहे. श्री. चौधरी यांच्या 15 वर्षांच्या प्रवासात डिजिटल प्रशासनाची ही मानवी बाजू अधोरेखित झाली आहे. तंत्रज्ञानाला सहानुभूती, संयम आणि जबाबदार सेवा वितरणाची जोड मिळते, तेव्हाच ते खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरते, हे या उदाहरणातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि नागरिकाभिमुख सेवेच्या याच भावनेसह आपली भावी वाटचाल पुढे चालू ठेवण्यास श्री. बाबासाहेब चौधरी उत्सुक आहेत. डिजिटल प्रशासनाचे यश हे केवळ तंत्रज्ञान किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर अवलंबून नसते, तर सेवेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकाच्या विश्वासावर आणि समाधानावर अवलंबून असते, याची जाणीव करून देणारी ही कथा आहे.



# आपले सरकार सेवा केंद्रांचे ब्रँडिंग

## प्रमाणित, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख सेवा जाळ्याच्या स्वरूपात आपले सरकार सेवा केंद्रांची फेररचना

स्थानिक सेवा केंद्रापासून ते डिजिटल प्रशासनाचा चेहरा ठरणाऱ्या, राज्यातील आपले सरकार सेवा केंद्रांचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्णय घेऊन महाराष्ट्र शासनाने एका नव्या परिवर्तनाचे सूतोवाच केले आहे. गावे, शहरे आणि महानगरांमध्ये शासकीय सेवा सुलभरित्या उपलब्ध करून देणाऱ्या या केंद्रांचा आणखी समाधानकारक अनुभव नागरिकांना देणे, हा या परिवर्तनामागचा उद्देश आहे.

### नागरिक सेवांना ओळख

महाराष्ट्रातील नागरिक सेवा केंद्रांचे विस्तृत जाळे हा राज्याच्या डिजिटल प्रशासन परिसंस्थेचा महत्त्वाचा भाग आहे. आपले सरकार सेवा केंद्रे आणि इतर संबंधित सेवा केंद्रांच्या माध्यमातून, नागरिक त्यांच्या घराजवळ विविध शासकीय सेवांचा लाभ घेऊ शकतात. सेवा केंद्रांचे हे जाळे ग्रामीण, शहरी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रांमध्ये विस्तारल्यामुळे, सेवा वितरणाचा समान दर्जा सुनिश्चित करणे जास्त महत्त्वाचे झाले आहे.

या केंद्रांच्या माध्यमातून शासकीय सेवा डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देणे एवढेच आव्हान नाही, तर ज्या नागरिकाभिमुख पायाभूत सुविधांद्वारे या सेवा प्रदान केल्या जातात, त्या सुद्धा नागरिकांना एकसारखा आणि पारदर्शक अनुभव देतील, याची खातरजमा करणे हे सुद्धा एक आव्हान आहे. पायाभूत सुविधा, नामफलक, ब्रँडिंग आणि सेवेच्या गुणवत्तेतील फरकांमुळे अधिकृत केंद्र कोणते, आणि उपलब्ध सेवांची माहिती किती सहजपणे समजते, याचा नागरिकांवर होणारा परिणाम वेगवेगळा असू शकतो.

सेवा केंद्रे एकसमान असण्याची गरज ओळखून महाराष्ट्र शासनाने 'आपले सरकार सेवा केंद्रां'साठी मानकीकरण आणि सामायिक ब्रँडिंग आराखडा तयार केला आहे. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने 23 जून 2026 रोजी जारी केलेल्या शासकीय निर्णयामध्ये सेवा केंद्रांची नावे, भौतिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा, नागरिकांसाठी उपयुक्त माहिती प्रदर्शन, बाह्य ब्रँडिंग, जीआयएस मॅपिंग आणि जिओ-फेन्सिंग, तपासणी, कामगिरीचे पुनरावलोकन आणि नागरिकांचा अभिप्राय अशा बाबींसाठी मानके निश्चित केली आहेत.

राज्यातील सेवा केंद्रांच्या संपूर्ण जाळ्यामध्ये समान ओळख आणि सेवा प्रदान करणाऱ्या समान मूलभूत सुविधा स्थापित करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. महाराष्ट्राच्या एका भागात 'आपले सरकार सेवा केंद्र' पाहणाऱ्या नागरिकाला दुसऱ्या भागातही तोच अनुभव मिळेल याची खातरजमा करणे, हा सुद्धा यामागचा उद्देश आहे. मानकीकरण आढाव्यामध्ये पायाभूत सुविधा, ब्रँडिंग आणि सेवेच्या गुणवत्तेतील विसंगती, केंद्र-स्तरावरील कामगिरीची मर्यादित दृश्यमानता आणि चालकांना अधिक प्रबळ प्रेरणा तसेच मान्यतेची गरज, असे महत्त्वाचे मुद्दे विचारात घेण्यात आले आहेत.

या दृष्टीने विचार करता, ब्रँडिंग हे व्यापक सेवा-वितरण परिवर्तनाचा एक घटक ठरते. निर्धारित ओळख, बाह्य फलक आणि नागरिकांना उपयुक्त माहिती देणारी भिंत या घटकांची सांगड भौतिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा मानके, डिजिटल पडताळणी यंत्रणा आणि देखरेख प्रणाली यांच्यासोबत घातली जाते आहे. त्यामुळे हा दृष्टिकोन, सेवा केंद्राची दृश्य ओळख आणि केंद्राच्या कार्यप्रणालीला आधार देणाऱ्या मानकांना परस्परांशी जोडणारा आहे.

राज्यातील सेवा केंद्रांच्या व्यापक नेटवर्कमुळे हे कार्य विशेषतः महत्त्वपूर्ण ठरते. 19 ऑगस्ट 2026 च्या मानकीकरण आढाव्यामध्ये महाराष्ट्रात सुमारे 32,000 सक्रिय सेवा केंद्रांची नोंद आहे, ज्यात 'आपले सरकार केंद्र', 'ग्रामपंचायत केंद्र' आणि 'शहरी सेवा केंद्र' यांचा समावेश आहे. एवढ्या मोठ्या आणि भौगोलिकदृष्ट्या विखुरलेल्या जाळ्याला एक समान आराखडा लागू करणे, ही महत्वाची बाब आहे,, आणि त्यामुळे राज्यभरात अधिक सुसंगत नागरिकाभिमुख सेवा केंद्रांचे जाळे तयार करण्याची संधी निर्माण होते आहे.

परिणामी, हा नवीन आराखडा ब्रँडिंगच्या पारंपरिक संकल्पनेच्या पलीकडे विचार करतो. महाराष्ट्रातील सेवा केंद्रांच्या जाळ्यामध्ये एक समान ओळख, समान मानक आणि समावेशक सेवा अनुभव प्रस्थापित करण्याचा, या आराखड्याचा प्रयत्न आहे.

### विशिष्ट ओळख

समान नामकरण हा या नवीन आराखड्यातील पहिला घटक होय. संपूर्ण महाराष्ट्रातील सेवा केंद्रांसाठी एक सुसंगत ओळख निर्माण करणे, हा यामागचा उद्देश आहे. शासन निर्णयामध्ये या केंद्रांसाठी चार प्रमाणित नावे सुचविण्यात आली आहेत: आपले सरकार - सेतू सेवा केंद्र, आपले सरकार - सेवा केंद्र, आपले सरकार - ग्रामपंचायत सेवा केंद्र आणि आपले सरकार - नागरी सेवा केंद्र. या केंद्रांसाठी इतर कोणतेही नामकरण किंवा संज्ञा वापरता येणार नाही.

सेवा केंद्रांची सुसंगत ओळख निर्माण करणे आणि नागरिकांना त्यांना राज्याच्या अधिकृत सेवा वितरण जाळ्याचा भाग म्हणून शासकीय सेवा केंद्र अधिक सहजपणे ओळखता यावे, हा या नामकरणामागचा उद्देश आहे.

या नामकरणाला समान दृश्यात्मक ओळखीची जोड सुद्धा देण्यात आली आहे. विहित नमुन्यातील बाह्य ब्रँडिंग, केंद्राचा विशिष्ट आयडी आणि पत्ता असणारी ही सेवा केंद्रे एका मोठ्या आणि भौगोलिकदृष्ट्या विखुरलेल्या जाळ्याचा एक भाग असतील, आणि ब्रँडची ग्रामीण, ग्रामपंचायत आणि शहरी भागांमध्ये 'आपले सरकार' एक विशिष्ट ओळख निर्माण होईल. या आराखड्यात शासकीय सेवांच्या नागरिकाभिमुख वितरणात सुसंगतता निर्माण करण्याचे व्यापक प्रयत्न दिसून येतात.

नवीन ब्रँडिंग आराखड्यात तीन परस्परसंबंधित पैलूंचा समावेश आहे:

- भौतिक पायाभूत सुविधा

- तांत्रिक पायाभूत सुविधा
- ब्रँडिंग आणि नागरिकांसाठी उपयुक्त माहिती

मानकीकरण पुनरावलोकनात कायमस्वरूपी पक्की इमारत, किमान क्षेत्रफळ, पुरेशी प्रकाश योजना आणि स्वच्छता, पिण्याचे पाणी, बॅकअपसह वीजपुरवठा, प्रतीक्षा-क्षेत्रातील आसनव्यवस्था आणि दिव्यांग व्यक्तींसाठी सुलभता अशा बाबींचा समावेश आहे. तांत्रिक बाबीसुद्धा तितक्याच महत्त्वाच्या आहेत.

प्रमाणित सेवा केंद्रामध्ये संगणक किंवा लॅपटॉप, प्रिंटर आणि स्कॅनर, फिंगरप्रिंट स्कॅनर, वेब कॅमेरा, आयरीस स्कॅनर आणि उत्तम इंटरनेट कनेक्टिव्हिटी असणे अपेक्षित आहे. शासन निर्णयानुसार ग्रामीण भागांसाठी किमान 10 Mbps आणि शहरी भागांसाठी 20 Mbps इंटरनेट गती निर्दिष्ट केली आहे. या पायाभूत सुविधा विश्वासार्ह नसतील तर नागरिकांसाठीचे डिजिटल सेवा केंद्र खऱ्या अर्थाने डिजिटल असू शकत नाही, हे या ठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे. अर्थात प्रमाणित आणि समान ओळख असणाऱ्या केंद्राच्या स्वरूपामुळे केंद्राच्या सेवा प्रदान करण्याच्या क्षमतेवरही परिणाम होतो.

## नागरिकांना माहिती देणारी भिंत

या उपक्रमातील 'नागरिकांना माहिती देणारी भिंत' हा सर्वात जास्त नागरिक-केंद्रित घटक असून प्रत्येक सेवा केंद्रामध्ये मुख्य सेवांबाबतची माहिती सहज उपलब्ध करून देण्यासाठी या भिंतीची रचना करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार, नागरिकांकडून सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या 15 सेवांची माहिती या भिंतीवर प्रदर्शित करणे आवश्यक आहे. इतर सेवांची उपलब्धता, निर्धारित कालावधी आणि लागू शुल्कासह माहिती क्यूआर कोडद्वारे उपलब्ध होईल.

नागरिकांना कोणती सेवा उपलब्ध आहे, त्यासाठी किती वेळ लागेल आणि कोणते शुल्क लागू आहे हे स्पष्टपणे समजू शकेल हा यामागचा मुख्य हेतू आहे, त्याचबरोबर सेवा वितरण अधिक पारदर्शक करणे आणि तोंडी स्पष्टीकरणावरील अवलंबित्व कमी करणे, हा सुद्धा, उपयुक्त माहिती सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यामागचा उद्देश आहे.

ही माहिती भिंत, नागरिकांना दिसेल अशा ठिकाणी सेवांची माहिती उपलब्ध करून देण्याच्या 'सेवा हक्क' आराखड्याप्रती शासनाच्या वचनबद्धतेचे प्रतीक ठरते आहे.

## प्रत्येक केंद्राला एक नवीन ओळख

बाह्य ब्रँडिंगसुद्धा प्रमाणित आहे. विहित पद्धतीनुसार बाह्य फलकावर केंद्राचा पत्ता आणि विशिष्ट केंद्र आयडी नमूद करायचा आहे आणि तो सहज दिसेल अशा ठिकाणी लावायचा आहे. अंमलबजावणी साहित्यात नमूद केलेला प्रमाणित आकार 6 × 2.5 फूट आहे, ज्यामध्ये फ्लेक्सवर छपाई करायची असून हाताने रंगवलेले कोणतेही पर्याय मान्य नाहीत.

अंमलबजावणी प्रक्रिया विचारपूर्वक सोपी ठेवण्यात आली आहे:

मंजूर नमूना डाउनलोड करा   केंद्राचा तपशील भरा -> विहित रचना प्रिंट करा -> नागरिकांना स्पष्टपणे दिसेल अशा ठिकाणी लावा.

## ब्रँडमागील तंत्रज्ञान

प्रत्येक सेवा केंद्राचे जीआयएस-मॅपिंग केले जाईल, आणि केंद्राभोवती 50-मीटरचे जिओ-फेन्सिंग क्षेत्र असेल. मंजुरी-प्राप्त मर्यादित अपवाद वगळता मंजूर जिओ-फेन्सिंगमुळे क्षेत्राबाहेरील लॉगिनचे प्रयत्न स्वयंचलितरित्या ब्लॉक केले जाऊ शकतात आणि चिन्हांकित केले जाऊ शकतात.

यामुळे प्रत्यक्ष सेवा नेटवर्कसाठी एक जबाबदार डिजिटल आवरण प्राप्त होते.

त्यामुळे केंद्राची ओळख केवळ नाव आणि फलकापुरती मर्यादित राहत नाही.

खालील गोष्टींशी केंद्राची ओळख जोडली जाते:

- स्थान
- ओळख
- अधिकृतता
- डिजिटल उपक्रम
- सेवा वितरण

हे संयोजन प्रशासकांना केंद्रांच्या कामकाजावर स्वतंत्रपणे जास्त लक्ष ठेवण्यास मदत करते, तसेच सेवा नेटवर्कची अखंडता मजबूत करते.

## स्व-घोषणेपासून सत्यापित अनुपालनापर्यंत

मानकीकरण केवळ घोषणांवर आधारित नाही, हा या कार्यक्रमाचा सर्वात महत्त्वाचा पैलू आहे.

पुनरावलोकन आराखड्यामध्ये तीन-टप्प्यांची पडताळणी रचना समाविष्ट आहे.

**1. केंद्राद्वारे स्वयं-अहवाल**

परिचालकांनी जीपीएस-सक्षम ऑनलाइन फॉर्म भरणे, थेट जिओ-टॅग केलेली छायाचित्रे देणे आणि विहित अनुपालन तपासणी सूचीला प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

**2. महाआयटी जिल्हा समन्वयकांतर्फे पडताळणी**

शासन निर्णयात विहित केलेल्या मानकांनुसार महाआयटीचे जिल्हा समन्वयक सादर केलेल्या माहितीचे पुनरावलोकन करतात. आवश्यक असल्यास प्रत्यक्ष स्थळभेटी घेतल्या जातात, छायाचित्रांची फेर-पडताळणी केली जाऊ शकते आणि अंशतः अनुपालन करणाऱ्या केंद्रांना आवश्यकता पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

**3. राज्य स्तरावर अचानक तपासणी**

सत्यापित माहितीच्या आधारे राज्य प्रशासन नामनिर्देशित राज्य-स्तरीय कर्मचाऱ्यांमार्फत कोणत्याही केंद्रांची अचानक तपासणी करू शकते, केंद्राची संपूर्ण पुनर्तपासणी करण्याची तरतूदही उपलब्ध आहे.

यामुळे विश्वासार्हतेची एक श्रृंखला तयार होते:
स्वयं-अहवाल -> पडताळणी -> अचानक तपासणी.

केवळ कागदपत्रांपुरते अनुपालन करण्यापासून पडताळणी करता येण्याजोग्या पुराव्याच्या स्वरूपातील अनुपालनापर्यंतचा हा विश्वासार्ह प्रवास आहे.

## परिवर्तनाच्या केंद्रस्थानी केंद्र परिचालक

केंद्र चालवणारे लोक या प्रक्रियेचा भाग असतील, तेव्हाच मानकीकरण यशस्वी होऊ शकते. स्वयं-अहवाल मार्गदर्शक तत्त्वांनुसार परिचालकांनी विहित बाह्य ब्रँडिंग प्रदर्शित करणे, नागरिकांना माहिती देणारी भिंत स्थापित करणे, आवश्यक भौतिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधांची खातरजमा करणे आणि केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहून अधिकृत स्वयं-अहवाल अर्ज पूर्ण करणे आवश्यक आहे. अर्ज सादर करण्यापूर्वी त्यांनी 100% अनुपालनाची खात्री करणे आवश्यक आहे.

ही प्रक्रिया जुन्या छायाचित्रांवर किंवा कागदपत्रांवर अवलंबून न राहता, सादर केली जाणारी माहिती प्रत्यक्ष केंद्राशी संबंधित आहे याची पडताळणी करण्यासाठी जीपीएस स्थान आणि थेट छायाचित्रांचा देखील वापर करते. परिचालकांनी सुधारणा केल्यास ते पुन्हा अर्ज सादर करू शकतात आणि सर्वात अलिकडे सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाईल. त्यामुळे त्रुटी ओळखण्याबरोबरच एका सोप्या डिजिटल प्रक्रियेद्वारे केंद्रांना आवश्यक सुधारणा पूर्ण करण्यास आणि त्यांचे अनुपालन सिद्ध करण्यास सक्षम करणे हा देखील या आराखड्याचा उद्देश आहे.

## महाआयटी जिल्हा समन्वयक: पडताळणीचा स्तर

या आराखड्यामध्ये महाआयटी जिल्हा समन्वयकांची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. या समन्वयकांनी जिल्हास्तरीय अनुपालनावर देखरेख ठेवणे, शासन निर्णयातील मानकांनुसार स्वयं-अहवालित अर्जांचे पुनरावलोकन करणे, सादर केलेल्या माहितीची पडताळणी करणे, अंशतः अनुपालन करणाऱ्या केंद्रांचा पाठपुरावा करणे आणि आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्व केंद्रे स्वयं-अहवालाच्या कक्षेत येतील, याची खातरजमा करणे अपेक्षित आहे.

या अर्थाने हे परिवर्तन केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित नाही. हे परिवर्तन राज्य मानकांना प्रत्यक्ष अंमलबजावणीशी जोडणारी क्षेत्रीय स्तरावरील प्रशासकीय यंत्रणा तयार करण्याविषयी सुद्धा आहे. जिल्हा हा धोरण आणि अंमलबजावणी यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा ठरतो.

मानकीकरण हा या मोठ्या परिवर्तनाचा एक भाग आहे.

यातील चार मुख्य उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत:

- नागरिक अभिप्राय प्रणाली
- केंद्र मानकीकरण मार्गदर्शक तत्त्वे
- केंद्र कामगिरी देखरेख
- केंद्र पुरस्कार आणि मान्यता चौकट

या उपाययोजनांचा समावेश असलेला हा आराखडा महत्वाचा आहे, कारण केवळ चांगले ब्रँडिंग असलेले केंद्र नागरिकांना चांगला अनुभव देईलच, याची खात्री देता येत नाही. आपले सरकार सेवा केंद्रांचे परिवर्तन केवळ दिसण्यातील समानता निर्माण करण्यापुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात नागरिकांना सेवा केंद्रांचा समान अनुभव प्रदान करणे, हा या परिवर्तनाचा मूळ उद्देश आहे.



# कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक जागरूकता प्रशिक्षण कार्यक्रम

## कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास महाराष्ट्रातील शासकीय कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन



शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि जनरेटिव्ह एआय'विषयी पायाभूत जागरूकता, व्यावहारिक आकलन आणि दैनंदिन कामकाजामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवण्यासाठी महाआयटी'तर्फे जागरुकता प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात आहेत.

मंत्रालयात 17 जुलै 2026 रोजी या कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रत्येक प्रशिक्षण तुकडीमध्ये सुमारे 60 कर्मचाऱ्यांचा समावेश असून, दररोज दोन तुकड्यांना प्रशिक्षण दिले जाते. अशा प्रकारे एकूण 70 तुकड्यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले असून, अशा प्रकारे मंत्रालयातील 4,204 कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाचा लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे.

21 ऑगस्ट 2026 पर्यंत एकूण 30 तुकड्यांचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाले. या कार्यक्रमात आतापर्यंत इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, सामान्य प्रशासन, गृह, वित्त, महसूल, नगरविकास, जलसंपदा तसेच महिला आणि बालविकास विभागासह 12 विभागांतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

त्याचबरोबर सर्वम एआय आणि द मेट्रोपॉलिटन इन्स्टिट्यूट यांच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्ता-संबंधी विविध साधनांचा समावेश असलेल्या एआय आणि जनरेटिव्ह एआय जागरुकता सत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. प्रात्यक्षिक सादरीकरणे, एआय साधने, एजेंटिक एआय, प्रत्यक्ष वापराची प्रकरणे, सादरीकरणाची गुणवत्ता आणि शासकीय कामातील वापरासाठी मार्गदर्शनाबाबत या कार्यक्रमातील सहभागींनी समाधान व्यक्त केल्याचे, त्यांच्या अभिप्रायावरुन दिसून आले.

### मंत्रालयात आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक जागरुकता प्रशिक्षण कार्यक्रम

17 जुलै 2026 रोजी मंत्रालयात कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक जागरुकता प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली. विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाचा लाभ घेता यावा, यासाठी कर्मचाऱ्यांचे गट करण्यात आले आहेत. प्रत्येक तुकडीमध्ये 60 कर्मचाऱ्यांचा समावेश असून आतापर्यंत अशा 30 तुकड्यांमधून 1,800 कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.



उर्वरित 40 तुकड्यांमधील सुमारे 2,400 कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण प्रदान करण्याचेही नियोजन आहे.

### विभागवार व्याप्ती

21 ऑगस्ट 2026 पर्यंत खालील 12 विभागांमधील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण प्रदान करण्यात आले आहे:

1. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग
2. सामान्य प्रशासन विभाग
3. गृह विभाग
4. महिला व बाल विकास विभाग
5. शहरी विकास विभाग
6. वित्त विभाग
7. महसूल विभाग
8. जलसंपदा विभाग
9. कौशल्य विकास विभाग
10. दिव्यांग व्यक्ती विभाग
11. अल्पसंख्याक विकास विभाग
12. पर्यावरण विभाग

हा कार्यक्रम केवळ तंत्रज्ञान-केंद्रित विभागांपुरता मर्यादित नाही, तर तो सर्व शासकीय विभागांतील कर्मचाऱ्यांसाठी प्रशासकीय, आर्थिक,

सामाजिक-विकास, पायाभूत सुविधा आणि नागरिकांशी संबंधित कामांच्या संदर्भात कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत टप्प्याटप्प्याने जागरूकता वाढवणारा आहे.

हा आंतर-विभागीय दृष्टिकोन महत्त्वाचा आहे, कारण शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब करताना तंत्रज्ञान-संबंधित कार्ये आणि दैनंदिन प्रशासकीय कामकाज व सेवा-वितरण उपक्रम या दोन्हींचा समावेश अपेक्षित आहे.

## प्रशिक्षण पद्धत

या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रात्यक्षिके आणि वास्तविक वापराच्या उदाहरणांद्वारे आर्टिफिशियल इंटेलिजन्स, जनरेटिव्ह एआय आणि व्यावहारिक एआय साधनांविषयी जागरूकता निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. सहभागींनी एआय साधने आणि त्यांची वैशिष्ट्ये, एजेंटिक एआय, अहवाल सारांशीकरण, डेटा विश्लेषण, कार्यालयीन कामांसाठीचे अनुप्रयोग, प्रस्तावाचे मसुदे तयार करणे, प्रशासनाशी संबंधित वापराची उदाहरणे आणि सर्वमच्या इंडस एआय, जेमिनाय आणि नॅपकिन अशा साधनांचे कौतुक केले. सोप्या, व्यावहारिक स्पष्टीकरणांचे आणि प्रात्यक्षिकांचेही त्यांनी कौतुक केले. कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामात एआयचा प्रभावी वापर करण्यास मदत करण्यासाठी अधिक तपशीलवार, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आणि विभाग-विशिष्ट प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याचेही, प्राप्त प्रतिसादांतून स्पष्ट झाले.

## सर्वम एआय सत्रे

सत्रातील सहभागींनी सादरीकरणाची गुणवत्ता, स्पष्टीकरणांचा साधेपणा, एआय वैशिष्ट्यांचा समावेश आणि व्यावहारिक उपयोगांचे विशेष कौतुक केले. त्यांना त्यांच्या कामासाठी इंडस एआय, एजेंटिक एआय, एआय एजंट्स, अहवाल सारांश, एआय व्हिडिओ क्षमता आणि प्रस्ताव निर्मिती विशेष उपयुक्त वाटली.

## मुख्य शिकवण

या कार्यक्रमाने कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी प्रारंभिक जागरूकता यशस्वीरित्या निर्माण केली आहे. मात्र यापुढे जात सहभागींनी अधिक सखोल व्यावहारिक अवलंबनाकडे वाटचाल करावी, अशी अपेक्षा आहे.

### पहिला टप्पा – जागरूकता

सध्याचा कार्यक्रम खालील बाबींवर यशस्वीरित्या लक्ष केंद्रित करत आहे:

- एआय म्हणजे काय
- जनरेटिव्ह एआय काय करू शकते
- उपलब्ध एआय साधने
- एजेंटिक एआय
- एआयची वैशिष्ट्ये
- मूलभूत शासकीय वापराची उदाहरणे

### दुसरा टप्पा – व्यावहारिक वापर

सहभागींच्या अभिप्रायानुसार खालील बाबींची मागणी आहे:

- प्रत्यक्ष सराव
- शासकीय कामाची वास्तविक उदाहरणे
- विभाग-विशिष्ट वापराची उदाहरणे
- प्रस्ताव मसुदा तयार करणे
- अहवाल तयार करणे
- एक्सेल/डेटा विश्लेषण
- कार्यालयीन उत्पादकता
- एआय-सहाय्यित दस्तऐवजीकरण
- एआय-सक्षम संशोधन
- एआय-आधारित सारांश

### तिसरा टप्पा – प्रगत वापर

या अभिप्रायाच्या आधारे भविष्यातील खालीलप्रमाणे प्रगत कार्यक्रमांची आखणी करता येईल:

- विभाग-विशिष्ट एआय कार्यप्रवाह
- एजेंटिक एआय
- एआय सहाय्यक
- एकात्मिक एआय साधने/कनेक्टर्स
- एआय प्रशासन
- जबाबदार एआय
- प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग
- एआय-सक्षम निर्णय सहाय्य
- कार्यप्रवाह स्वयंचलन

## मुख्य निरीक्षणे

1. कार्यक्रमाची उत्तम गती
   नियोजित 70 तुकड्यांपैकी 30 तुकड्यांना प्रशिक्षण देत या कार्यक्रमाने उत्तम प्रगती राखली आहे.
2. व्यापक विभागीय सहभाग
   हा कार्यक्रम आतापर्यंत 12 विभागांपर्यंत पोहोचला आहे, यावरून त्याची उपयुक्तता दिसून येते.
3. सहभागींचे समाधान
   विश्लेषण केलेल्या अभिप्रायानुसार, एकूण सरासरी गुणांकन 10 पैकी 8.5 आहे.
4. शिफारस करण्याची प्रबळ इच्छा
   नोंदणी केलेल्या प्रतिसादकांपैकी सुमारे 97% लोकांनी, आपण आपल्या सहकाऱ्यांना या प्रशिक्षणाची शिफारस करणार असल्याचे सूचित केले.
5. एआयच्या व्यावहारिक वापराची संधी
   प्रस्ताव मसुदा तयार करणे, एक्सेल/डेटा विश्लेषण, अहवाल तयार करणे आणि कार्यालयीन कामांसंदर्भातील अभिप्राय पाहता, कर्मचाऱ्यांना आधीपासूनच एआयचे व्यावहारिक उपयोग ठाऊक असल्याचे दिसते आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठीचे प्रस्तावित प्रशिक्षण, मंत्रालय-कर्मचाऱ्यांकडून प्राप्त अभिप्रायांवर आधारित असू शकते आणि त्यात सुरुवातीपासूनच अधिक संरचित, व्यावहारिक आणि विभाग-विशिष्ट मॉडेलचा समावेश केला जाऊ शकेल.

मंत्रालयात आयोजित एआय जागरूकता प्रशिक्षणाची वाटचाल उत्तम सुरू आहे. नियोजित 70 तुकड्यांपैकी 30 तुकड्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून आतापर्यंत 12 विभागांतील कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे. सहभागींचा प्रतिसाद सकारात्मक असून, एकूण सरासरी गुणांकन 10 पैकी 8.5 आहे. आपण आपल्या सहकाऱ्यांना या प्रशिक्षणाची शिफारस करणार असल्याचे 34 पैकी 33 प्रतिसादकांनी सांगितले. या प्रतिसादातून अधिक तपशीलवार, प्रात्यक्षिक आणि विभाग-विशिष्ट प्रशिक्षणाची स्पष्ट मागणी दिसून आली. प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागींना त्यांच्या दैनंदिन शासकीय कामाशी संबंधित व्यावहारिक

उदाहरणे अपेक्षित आहेत. त्यात प्रस्तावाचा मसुदा तयार करणे, डेटा विश्लेषण, अहवाल तयार करणे आणि ऑफिस ॲप्लिकेशन्स यांचा समावेश आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे 7,000 कर्मचाऱ्यांसाठी प्रस्तावित प्रशिक्षणामुळे या उपक्रमाचा विस्तार करण्याची आणि अधिक व्यावहारिक व विभाग-केंद्रित प्रशिक्षण पद्धतींचा समावेश करण्याची संधी मिळणार आहे.

एआय जागरूकता प्रशिक्षण कार्यक्रम म्हणजे एआय बाबत जागरूकता आणि क्षमता निर्माण करण्याच्या दिशेने महाराष्ट्र शासनाचे एक महत्त्वाचे पाऊल आहे. मंत्रालयातील अधिकाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षणाची प्रगती आणि सहभागींच्या सकारात्मक प्रतिसादावरून या उपक्रमाची प्रासंगिकता लक्षात येते. भविष्यात, प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण, शासकीय वापराची व्यावहारिक उदाहरणे आणि विभाग-विशिष्ट वापरावर अधिक भर दिल्यास, या कार्यक्रमाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत मूलभूत जागरूक करण्यापासून त्यांच्या दैनंदिन कामात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्यापर्यंत प्रगती करण्यास मदत होऊ शकेल. आगामी प्रशिक्षण सत्रांद्वारे या प्रयत्नांचा विस्तार करण्याची आणि एआय क्षमता उभारणी करण्याची संधी महाआयटीला उपलब्ध होणार आहे.










# जिद्दीला मिळाले डिजिटल बळ आणि आयुष्याला, नवी दिशा!



## सचिन गोताड यांचे रत्नागिरीतील आपले सरकार सेवा केंद्र ठरले आत्मविश्वास आणि स्वावलंबनाची नवी वाट

रत्नागिरी म्हटले की डोळ्यांसमोर उभा राहतो तो हिरवाईने नटलेला डोंगर, वळणावळणाचे रस्ते, पावसाच्या सरींनी चिंब झालेली गावे आणि डोंगराच्या कुशीत विसावलेली छोटी छोटी घरे. निसर्गाने या भूमीला भरभरून दिले असले, तरी याच निसर्गरम्य ठिकाणी राहणाऱ्या अनेकांच्या आयुष्यातील वाटा मात्र तेवढ्या सोप्या नसतात. काही अंतर केवळ किलोमीटरमध्ये मोजता येते, पण काहींसाठी ते अंतर पार करण्यामागे असते संघर्षाची, जिद्दीची आणि असंख्य अडचणींची कहाणी.

रत्नागिरी जिल्ह्यातील सचिन गोताड यांची कहाणी अशाच एका वाटेची आहे. आज सचिन ३१ वर्षांचे आहेत. बारावीपर्यंत शिक्षण घेतलेले सचिन आज स्वतःचा व्यवसाय सांभाळत आहेत आणि आपल्या गावातील नागरिकांना विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याचे काम करीत आहेत. मात्र आजचे हे चित्र पाहण्यापूर्वी त्यांना आयुष्याच्या ज्या वाटेवरून जावे लागले, जिथे त्यांना प्रत्येक पाऊल जिद्दीने टाकावे लागले.

लहानपणी झालेल्या पोलिओमुळे सचिन यांना दिव्यांगत्व आले. ही मर्यादा त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांच्यासमोर उभी राहिली. पण त्या मर्यादेपेक्षा मोठे होते त्यांचे कुटुंब, त्यांचे शिक्षक, मित्र आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांची स्वतःची जिद्द.

### शाळेची वाट आईच्या पाठीवरून...

सचिन यांच्या शिक्षणाची सुरुवात झाली ती देवळे गावातील शाळेत. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी याच शाळेत घेतले. मात्र शाळा घरापासून लांब होती. दिव्यांगत्वामुळे त्यांच्यासाठी रोजची शाळेची वाट सहज नव्हती.

मग आई पुढे आली. सचिन यांना पाठीवर घेऊन आई रोज शाळेत घेऊन जायची आणि शाळा सुटल्यानंतर पुन्हा घरी आणायची. मुलाने शिकावे, पुढे जावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे, या आईच्या इच्छेपुढे अंतराची अडचण लहान ठरली.

त्या काळात सचिन यांच्यासाठी शाळेपर्यंत पोहोचणे हीच एक मोठी परीक्षा होती. मात्र त्यांच्या आईसाठी ती परीक्षा नव्हती; ती मुलाच्या भविष्यासाठीची जबाबदारी होती. अशा प्रकारे इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले.

पुढे इयत्ता आठवी ते दहावीच्या शिक्षणासाठी त्यांनी वांझोळे गावातील हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. इथे अडचण आणखी मोठी होती. घरापासून शाळेचे अंतर तब्बल अडीच किलोमीटर होते. प्रवासासाठी कोणतेही साधन नव्हते. रोज शाळेत जाणे शक्य होत नव्हते. पण सचिनची शिकण्याची इच्छा कमी झाली नाही. त्यांची परिस्थिती शिक्षकांनी समजून घेतली. शाळेत नियमित उपस्थित राहणे शक्य नसले, तरी शिक्षण थांबता कामा नये, यासाठी शिक्षकांनी त्यांना घरी राहून अभ्यास करण्याची परवानगी दिली. शाळेचा गृहपाठ गावातील इतर विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या घरी पाठविला जाऊ लागला. एका अर्थाने शाळा त्यांच्या घरापर्यंत आली होती.

शिक्षकांची ही संवेदनशीलता आणि सचिन यांची अभ्यासाची जिद्द यांचा सुंदर संगम झाला. अडचणी असूनही त्यांनी दहावीची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केली.

### इयत्ता बारावीपर्यंतचा प्रवासही संघर्षाचाच

इयत्ता दहावीनंतर शिक्षण थांबवावे लागेल, असे वाटण्यासारखी परिस्थिती होती, पण सचिन यांनी पुढील शिक्षणासाठी साखरपा येथील महाविद्यालयात प्रवेश घेतला. आता घरापासून दूर जाऊन शिक्षण घ्यायचे होते. मित्रांनी ही जबाबदारी स्वीकारली. ते सचिन यांना दररोज महाविद्यालयात घेऊन जात आणि पुन्हा वसतिगृहात सोडत. पुढील

दोन वर्षे त्यांनी वसतिगृहात राहून बारावीचे शिक्षण पूर्ण केले. या दोन वर्षांच्या प्रवासात सचिन यांना अनेक अडचणी आल्या. मात्र शिक्षक, मित्र आणि कुटुंबीय यांचे सहकार्य त्यांना सतत मिळत राहिले.

आज सचिन यांनी आपल्या आयुष्याकडे मागे वळून पाहिले, तर प्रत्येक शैक्षणिक टप्प्यामागे त्यांना कोणाचा ना कोणाचा हात दिसतो. आईची माया, शिक्षकांची संवेदनशीलता, मित्रांची साथ आणि कुटुंबीयांचे प्रोत्साहन यामुळेच त्यांची शिक्षणाची वाट पुढे सरकत राहिली. पण बाहेरच्या अडचणींपेक्षा एक संघर्ष अधिक मोठा होता. तो होता स्वतःला स्वीकारण्याचा.

'मी स्वतःला स्वीकारले नाही तर...'

दिव्यांगत्वाला आपली ताकद मानण्याचा निर्धार एका दिवसात निर्माण झालेला नाही. त्याआधी अनेक भावनिक, शारीरिक आणि सामाजिक अडथळे सचिन यांच्या वाट्याला आले.

समाज आपल्याकडे कसे पाहतो, लोक आपल्याला स्वीकारतील का, आपण स्वतः काही करू शकू का, असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होत होते.

त्यातील सर्वांत मोठा प्रश्न होता, 'मी स्वतःला स्वीकारले नाही तर दुसरे मला कसे स्वीकारतील?' या प्रश्नाचे उत्तर हळूहळू सापडत गेले.

शिक्षण पूर्ण होत गेले. अडचणींचा सामना करण्याचा आत्मविश्वास वाढत गेला. प्रत्येक छोट्या यशाने मनातील भीती कमी होत गेली. स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत गेला. आणि या सगळ्या प्रवासात आई खंबीरपणे सोबत होती.

जग कधी कधी नकारात्मक विचार करू शकते; परिस्थिती निराश करू शकते; पण कुटुंबाची साथ असेल, तर माणूस पुन्हा उभा राहू शकतो. सचिन यांच्या आयुष्यात ही साथ सर्वांत ठळकपणे त्यांच्या आईच्या रूपाने होती. जन्मापासून आजपर्यंत आईने प्रत्येक अडचणीत त्यांना साथ दिली.

## शासकीय योजनांपर्यंत पोहोचतानाही अडचणी

दिव्यांग व्यक्ती म्हणून शासनाच्या योजनांचा लाभ मिळवितानाही सचिन यांना अडचणींचा सामना करावा लागला. संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळविताना त्यांना मोठी प्रतीक्षा करावी लागली. त्यावेळी सेतू कार्यालय तालुक्याच्या ठिकाणी होते. सचिन यांच्या आई-वडिलांचे शिक्षणही मर्यादित असल्याने विविध प्रक्रिया समजून घेणे आणि त्या पूर्ण करणे सहज शक्य नव्हते. परिणामी योजनेचा लाभ मिळण्यास विलंब झाला.

हीच बाब त्यांच्या मनात कायम राहिली. शासकीय योजना आहेत, त्या नागरिकांसाठी आहेत; पण त्या नागरिकांपर्यंत सहज पोहोचण्यासाठी व्यवस्था अधिक सुलभ असणे किती महत्त्वाचे आहे, याचा अनुभव त्यांनी स्वतः घेतला होता. कदाचित याच अनुभवाने पुढे त्यांच्या आयुष्यातील एका नव्या भूमिकेची पायाभरणी केली.

## छोट्या दुकानातून मोठ्या प्रवासाची सुरुवात

सन 2022 मध्ये सचिन यांनी एक छोटेसे दुकान सुरू केले. झेरॉक्स सेवा आणि मोबाईल साहित्य विक्री असा व्यवसाय त्यांनी सुरू केला. दुकान छोटे होते; पण स्वावलंबनाचे स्वप्न मोठे होते. स्वतःच्या व्यवसायातून उत्पन्न मिळवण्यास सुरुवात झाली. लोकांशी संपर्क वाढला. गावातील नागरिक त्यांच्या दुकानात विविध कामांसाठी येऊ लागले.

2024 साली त्यांनी कॉमन सर्व्हिस सेंटर अर्थात सीएससीची मान्यता घेतली. आता गावातील नागरिकांच्या विविध कामांमध्ये त्यांना मदत करता येऊ लागली. दुकानात येणारा प्रत्येक नागरिक केवळ ग्राहक राहिला नाही; तो सचिन यांच्या कामाचा एक भाग बनला.

कोणाला एखादा दाखला हवा होता, कोणाला शासकीय कामासाठी मार्गदर्शन हवे होते, कोणाला ऑनलाइन प्रक्रिया समजून घ्यायची होती. सचिन त्यांना शक्य ती मदत करू लागले. याच काळात इंटरनेटवर माहिती शोधताना त्यांना 'आपले सरकार सेवा केंद्र' या उपक्रमाची माहिती मिळाली. आणि इथून त्यांच्या आयुष्याची दिशा पुन्हा एकदा बदलू लागली.

## रत्नागिरी जिल्ह्याच्या संकेतस्थळावरची ती प्रतीक्षा

'आ'आपले सरकार सेवा केंद्रा'साठी अर्जाची संधी उपलब्ध होईल, याची सचिन वाट पाहू लागले. रत्नागिरी जिल्ह्याच्या संकेतस्थळावर अर्ज कधी निघतो आहे का, याची ते नियमितपणे तपासणी करीत राहिले. एक दिवस, दोन दिवस, आठवडे., महिने. प्रतीक्षा सुरूच होती. पण जिद्द असलेल्या माणसाला प्रतीक्षाही थांबवू शकत नाही. सचिन यांनी संकेतस्थळ तपासणे सोडले नाही.

अखेर अर्जाची संधी उपलब्ध झाली. त्यांनी तत्काळ अर्ज भरला. आता पुन्हा प्रतीक्षा होती. मात्र या वेळी प्रतीक्षेच्या पलीकडे एक नवे स्वप्न होते. स्वतःच्या गावातील नागरिकांना त्यांच्या गावातच शासकीय सेवा उपलब्ध करून देण्याचे स्वप्न. आणि अखेर तो दिवस आला, 4 ऑक्टोबर 2025. या दिवशी सचिन यांना 'आपले सरकार सेवा केंद्रा'चा आयडी आणि पासवर्ड प्राप्त झाला.

हा केवळ आयडी आणि पासवर्ड नव्हता, तर एका दिव्यांग युवकाच्या हातात डिजिटल सेवांचे माध्यम आले होते. ज्या शासकीय सेवांसाठी एकेकाळी त्यांना स्वतःला आणि कुटुंबाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले होते, त्याच शासकीय सेवा आता आपल्या गावातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची संधी त्यांना मिळाली होती.

## आता तालुक्याची वाट गावातच येऊ लागली

आपले सरकार सेवा केंद्र सुरू झाल्यानंतर सचिन यांच्या कामाला नवी दिशा मिळाली. गावातील नागरिकांना विविध दाखले, प्रमाणपत्रे आणि शासनाच्या योजनांशी संबंधित सेवा आता गावातच उपलब्ध होऊ लागल्या.

पूर्वी एखाद्या शासकीय कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागले की त्यासाठी वेळ, प्रवासाचा खर्च आणि दिवसाचे काम यांचा मेळ घालावा लागत असे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही बाब अनेकदा त्रासदायक ठरते.

आता परिस्थिती बदलली. गावातील नागरिक सचिन यांच्या केंद्रात येऊ लागले. त्यांच्या हातातील संगणक आणि डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून शासकीय सेवा नागरिकांपर्यंत पोहोचू लागल्या. नागरिकांचे काम झाले की त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान

सचिन यांच्यासाठीही तितकेच महत्त्वाचे होते. कारण आता ते केवळ स्वतःचा व्यवसाय करीत नव्हते. ते आपल्या गावातील नागरिकांच्या शासकीय कामांना गती देत होते.

## एका केंद्राने बदलले अनेक आयुष्यांचे गणित

आपले सरकार सेवा केंद्रामुळे नागरिकांना सेवा गावातच मिळू लागल्या. त्यांचा वेळ वाचला. प्रवासाचा त्रास कमी झाला. शासनाच्या विविध योजनांची माहिती आणि सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होऊ लागल्या.

याचा परिणाम सचिन यांच्या व्यवसायावरही झाला. त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. गावातील नागरिकांशी त्यांचा संपर्क अधिक वाढला. लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास वाढत गेला.

सचिन यांच्यासाठी हा बदल आर्थिक लाभापेक्षा कितीतरी मोठा होता. एकेकाळी शिक्षणासाठी ज्या मुलाला त्याच्या आईने पाठीवर घेऊन शाळेपर्यंत पोहोचवले होते, तो मुलगा आज आपल्या गावातील नागरिकांच्या शासकीय कामांसाठी आधार बनला होता.

एकेकाळी शासकीय योजनांचा लाभ मिळवितांना अडचणी अनुभवलेला युवक आज इतर नागरिकांना शासकीय सेवांपर्यंत पोहोचण्यास मदत करीत होता. आणि एकेकाळी स्वतःच्या दिव्यांगत्वाकडे अडथळा म्हणून पाहणारा सचिन आज त्याच दिव्यांगत्वाला आपल्या सामर्थ्याचा भाग मानत होता.

## आईची काळजी आता समाधानात बदलली

या प्रवासाचा सर्वांत भावनिक भाग कदाचित त्यांच्या आईच्या मनात घडलेला बदल आहे. एकेकाळी मुलाच्या भविष्याची चिंता त्यांच्या आईला सतावत असे. सचिन पुढे कसे उभे राहतील, त्यांचा व्यवसाय कसा चालेल, त्यांचे आयुष्य कसे घडेल, या प्रश्नांची काळजी स्वाभाविक होती.

आज मात्र ती चिंता कमी झाली आहे. मुलगा स्वतःचा व्यवसाय करीत आहे. नागरिकांची कामे करीत आहे. स्वतःच्या पायावर उभा राहण्याचा प्रयत्न करीत आहे आणि समाजासाठीही योगदान देत आहे. आईसाठी यापेक्षा मोठे समाधान आणखी काय असू शकते?

## डिजीटल महाराष्ट्राच्या वाटेवरील एक प्रेरणादायी पाऊल

सचिन गोताड यांची कहाणी केवळ संघर्ष करून यश मिळविणाऱ्या एका व्यक्तीची कथा नाही. ही कथा आहे तंत्रज्ञानाने शासन आणि नागरिक यांच्यातील अंतर कमी करण्याची. शासनाच्या योजना आणि सेवा कागदोपत्री उपलब्ध असणे महत्त्वाचे आहेच; मात्र त्या सेवा नागरिकांपर्यंत सहज, सुलभ आणि प्रभावीपणे पोहोचणे त्याहून महत्त्वाचे आहे. डिजिटल माध्यमातून हीच प्रक्रिया अधिक सक्षम करण्याचे काम सुरू आहे.

'आपले सरकार सेवा केंद्र' हा या परिवर्तनाचा गावपातळीवरील महत्त्वाचा दुवा ठरतो. रत्नागिरीसारख्या भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक जिल्ह्यात गावागावांत शासकीय सेवा उपलब्ध होणे म्हणजे नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यात प्रत्यक्ष बदल घडवून आणणे होय.

सचिन यांच्यासारख्या व्यक्ती या बदलाला मानवी चेहरा देतात, कारण डिजिटल सेवा संगणकाच्या पडद्यावर सुरू होत असल्या तरी त्यांचा खरा परिणाम नागरिकाच्या आयुष्यात दिसतो. सचिन यांच्या हातातील संगणकाच्या पडद्यावर उमटणारी प्रत्येक डिजिटल नोंद ही त्यांच्या स्वतःच्या संघर्षाचीही एक आठवण आहे. एकेकाळी अंतरामुळे शिक्षणासाठी अडचण आलेली होती. आज तेच अंतर मिटवण्याचे काम डिजिटल सेवा करत आहेत. एकेकाळी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागणाऱ्या नागरिकांची पावले आता गावातीलच सेवा केंद्राकडे वळत आहेत.

## जिद्द तिथेच होती; फक्त तिला नवे माध्यम मिळाले

सचिन गोताड यांच्या आयुष्यात हा बदल एका दिवसात झाला नाही. अनेक वर्षांत तो बदल घडत गेला आहे.

आईच्या पाठीवरून सुरू झालेली शाळेची वाट शिक्षकांच्या सहकार्याने पुढे गेली. मित्रांच्या साथीने बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. संघर्षातून आत्मविश्वास निर्माण झाला. छोट्या दुकानातून व्यवसायाची सुरुवात झाली. सीएससी केंद्रामुळे नागरिकांशी नाते जोडले गेले आणि 'आपले सरकार सेवा केंद्रा'च्या माध्यमातून त्या नात्याला सेवाभावाची नवी दिशा मिळाली.

आज सचिन गावात बसून नागरिकांची कामे करतात. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक नागरिकासाठी ते केवळ सेवा केंद्र चालक नाहीत, तर शासनाच्या सेवा आणि सामान्य नागरिक यांच्यामधील ते एक विश्वासू दुवा आहेत. आणि म्हणूनच सचिन गोताड यांची कथा एका वाक्यात सांगायची झाली, तर 'अडचणींनी त्यांची वाट अडवली, पण जिद्दीने त्यांना पुढे नेले; आणि डिजिटल शासनाने त्या जिद्दीला एक नवे बळ दिले.'

रत्नागिरीच्या हिरव्यागार डोंगरदऱ्यांमध्ये आज एक छोटीशी जागा अनेक नागरिकांसाठी शासनाच्या सेवांचे प्रवेशद्वार बनली आहे. त्या प्रवेशद्वारामागे उभा आहे एक जिद्दी युवक. आणि त्यांच्या प्रवासातून उमटणारा संदेशही तितकाच स्पष्ट आहे :

"शासन नागरिकांपर्यंत पोहोचते, तेव्हा केवळ सेवा उपलब्ध होत नाहीत; तर माणसाच्या आयुष्याला नवी दिशा मिळते."



# नागरिकांशी संवाद, समुदाय सहभाग आणि डिजिटल प्रशासनातील व्हीएलईंची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी प्रायोगिक उपक्रम

## नागरिकांशी संवाद, समुदाय सहभाग आणि डिजिटल प्रशासनातील VLEची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी प्रायोगिक उपक्रम

सुलभीकरण व समन्वय : महाआयटी क्षमता उभारणी कक्ष

आज शासनाच्या अधिकाधिक सेवा ऑनलाइन उपलब्ध होत आहेत. मात्र, एखादी सेवा डिजिटल स्वरूपात उपलब्ध असणे आणि प्रत्येक नागरिकाला ती सहजपणे समजणे, वापरता येणे आणि त्याचा लाभ घेता येणे या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. विशेषतः तळागाळातील घटकापर्यंत सेवा पोहोचवताना तंत्रज्ञानाइतकाच मानवी संवाद आणि प्रत्यक्ष सहाय्याचा दुवा महत्त्वाचा ठरतो.

आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये कार्यरत असलेले ग्रामस्तरीय उद्योजक (VLEs) हे असा महत्त्वाचा दुवा आहेत. नागरिक त्यांच्याकडे केवळ ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी किंवा एखादा डिजिटल व्यवहार पूर्ण करण्यासाठी येत नाहीत. एखादी प्रक्रिया समजून घेणे, आवश्यक कागदपत्रांची माहिती मिळवणे, अर्ज करताना येणाऱ्या अडचणी सोडवणे किंवा समस्या निर्माण झाल्यास योग्य मार्गदर्शन मिळवणे अशा अनेक बाबतीत ते VLE वर अवलंबून असतात.

VLE च्या या व्यापक भूमिकेचा विचार करून महाआयटी आणि ग्राम वाणी यांच्या भागीदारीत व्हीएलईंची क्षमता अधिक वृद्धिंगत करण्यासाठी एक प्रायोगिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचे सुलभीकरण आणि समन्वय महाआयटीच्या क्षमता उभारणी कक्षामार्फत करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात नाशिक आणि हिंगोली जिल्ह्यांतील निवडक भागांमधील 100 ते 150 व्हीएलई सहभागी होणार आहेत. हा उपक्रम केवळ एकदाच प्रशिक्षण देण्यापुरता मर्यादित न राहता क्षमता उभारणी, तंत्रज्ञानाचा वापर, नागरिक व समुदायाशी प्रत्यक्ष संवाद, अनुभवातून शिकणे, व्हीएलईंचे परस्पर सहकार्य आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतून पुरावे व अनुभव निर्माण करणे अशा विविध घटकांना एकत्र आणणार आहे.

### सेवा देण्यापासून नागरिकांना सक्षम करण्याकडे

व्हीएलईंना विविध डिजिटल प्रणाली आणि शासकीय सेवा हाताळण्याचा प्रत्यक्ष अनुभव आहे. आता या तांत्रिक कौशल्याच्या पलीकडे जाऊन त्यांची नागरिक व समुदायाशी संबंधित क्षमता अधिक विकसित करण्याची संधी आहे.

आपल्या परिसरातील नागरिकांच्या गरजा व्हीएलईने कशा समजून घ्याव्यात? डिजिटल सेवांपासून दूर राहणाऱ्या नागरिकांपर्यंत कसे पोहोचावे? नागरिकांचा अभिप्राय पद्धतशीरपणे कसा नोंदवावा? अनेक नागरिकांना वारंवार येणाऱ्या समान अडचणींची माहिती सेवा व्यवस्था सुधारण्यासाठी कशी उपयोगी ठरू शकते? या प्रश्नांची उत्तरे प्रत्यक्ष क्षेत्रातील अनुभवातून शोधण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे.

सहभागी व्हीएलईंसाठी संरचित क्षमता विकास प्रक्रिया राबविली जाईल. समुदायाशी संवाद व सहभाग, नागरिकांच्या गरजा समजून घेणे, डिजिटल साधनांचा परिणामकारक वापर आणि सेवा व उत्पन्नाच्या शाश्वत संधींचा शोध अशा बाबींवर यात भर असेल. सुरुवातीला व्हीएलईंची विद्यमान कौशल्ये, उपलब्ध पायाभूत सुविधा, सेवा देण्याची पद्धत आणि त्यांना येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी आधारभूत मूल्यमापन केले जाईल. त्यामुळे पुढील प्रशिक्षण आणि सहाय्य प्रत्यक्ष गरजांशी जोडता येईल.

हा उपक्रम महाआयटीच्या व्यापक क्षमता उभारणी प्रयत्नांशीही जोडला जाणार आहे. ग्राम वाणीचा Community Development Entrepreneur (CDE) अभ्यासक्रम आणि महाआयटी–YCMOU Digital Governance Certificate Course यांची सांगड घालण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे दोन्ही उपक्रमांमध्ये पुनरावृत्ती टाळून व्हीएलईंसाठी परस्परपूरक आणि अधिक उपयुक्त शिक्षण अनुभव निर्माण करता येईल.

### मानवी संवादाला बळ देणारे तंत्रज्ञान

या उपक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे क्षमता उभारणीसोबत मराठीतील व्हॉइस आणि डिजिटल संवाद साधनांचा वापर.

IVR, WhatsApp आधारित संवाद, Case Management आणि Dashboard यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे प्रस्तावित आहे. या माध्यमातून व्हीएलईंना समुदायाशी अधिक पद्धतशीर संवाद साधणे, नागरिकांपर्यंत माहिती पोहोचवणे, त्यांचा प्रतिसाद जाणून घेणे तसेच अभिप्राय किंवा तक्रारींची नोंद करणे अधिक सुलभ होऊ शकते.

तळागाळातील घटकांपर्यंत डिजिटल सेवा पोहोचवताना हे विशेष महत्त्वाचे आहे. प्रत्येक नागरिकाला संकेतस्थळ, मोबाइल ॲप किंवा मजकूरप्रधान डिजिटल माध्यमे सहजपणे वापरता येतीलच, असे नाही. अशा परिस्थितीत आवाजावर आधारित सुविधा आणि नागरिकांच्या परिचयाची संवाद माध्यमे त्यांना डिजिटल प्रशासनाशी जोडण्याचे अतिरिक्त मार्ग उपलब्ध करून देऊ शकतात.

त्यामुळे या उपक्रमात तंत्रज्ञान हे स्वतंत्र उद्दिष्ट नाही. व्हीएलईंच्या कार्याला अधिक सक्षम करणारे साधन म्हणून तंत्रज्ञानाकडे पाहिले जात आहे. नागरिकांपर्यंत पोहोचणे, त्यांच्या गरजा समजून घेणे आणि नागरिक व सेवा व्यवस्था यांच्यात अधिक सुसंगत संवाद निर्माण करणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे.

## व्हीएलईंसाठी परस्पर शिक्षणाची साखळी

या उपक्रमातील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे P e e r Learning - एकमेकांच्या अनुभवातून शिकणे.

सहभागी व्हीएलईंमधून अनुभवी आणि सक्षम व्हीएलईंची Mentor व्हीएलई म्हणून निवड करण्याचे प्रस्तावित आहे. हे Mentor व्हीएलई इतर व्हीएलईंना मार्गदर्शन करू शकतील, प्रत्यक्ष कामातील अनुभव आणि उपाय सामाईक करू शकतील तसेच औपचारिक प्रशिक्षणाच्या पलीकडेही शिकण्याची प्रक्रिया सुरू ठेवण्यास मदत करू शकतील.

अनेकदा एका व्हीएलईंसाठी सर्वाधिक उपयुक्त मार्गदर्शन त्याच्यासारख्याच परिस्थितीत काम करणाऱ्या आणि तशाच समस्यांना सामोरे गेलेल्या दुसऱ्या व्हीएलईंकडून मिळू शकते, हा यामागचा विचार आहे.

अशा परस्पर शिक्षणाच्या व्यवस्थेमुळे चांगले अनुभव आणि परिणामकारक पद्धती एका सेवा केंद्रापुरत्या मर्यादित न राहता इतर व्हीएलईंपर्यंत पोहोचण्यास मदत होऊ शकते.

## विस्तारापूर्वी प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्यावर भर

हा उपक्रम केवळ अंमलबजावणीचा प्रकल्प नसून प्रत्यक्ष क्षेत्रातून शिकण्याची संधी म्हणूनही याकडे पाहिले जात आहे.

उपक्रमाच्या सुरुवातीला आणि शेवटी केलेल्या मूल्यमापनाच्या माध्यमातून व्हीएलईंची डिजिटल तयारी, सेवा देण्याची पद्धत, प्रशिक्षणाच्या गरजा, प्रेरणा आणि प्रत्यक्ष कामातील अडचणी यामध्ये झालेला बदल अभ्यासला जाईल. प्रशिक्षणातील सहभाग, प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या नोंदी आणि नियमित आढावा यांच्या माध्यमातून कोणत्या बाबी परिणामकारक ठरत आहेत आणि कुठे बदलांची आवश्यकता आहे, हे समजून घेतले जाईल.

तळागाळातील घटकासाठी तयार केलेल्या कोणत्याही उपक्रमाला प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे आवश्यक असते. त्यामुळे एकच पद्धत सर्व ठिकाणी तशीच लागू होईल असे गृहीत न धरता, नाशिक आणि हिंगोलीमधील अनुभवातून कोणते उपाय उपयुक्त ठरतात, व्हीएलईंना नेमक्या कोणत्या प्रकारच्या सहाय्याची गरज आहे आणि विविध संवाद माध्यमांना नागरिकांचा कसा प्रतिसाद मिळतो हे समजून घेण्यावर भर राहील.

या अनुभवांच्या आधारे प्रत्यक्ष क्षेत्रात तपासलेल्या पद्धती, पुन्हा वापरता येणारी साधने, Mentor व्हीएलई व्यवस्था आणि यशस्वी उदाहरणांचे दस्तऐवजीकरण विकसित केले जाईल. भविष्यात हा दृष्टिकोन इतर जिल्ह्यांमध्ये विस्तारण्याबाबत निर्णय घेण्यासाठी हा अनुभव उपयोगी ठरेल.

## क्षमता उभारणी ही सातत्यपूर्ण प्रक्रिया

महाआयटीच्या दृष्टीने हा उपक्रम क्षमता उभारणीकडे पाहण्याच्या व्यापक दृष्टिकोनाचाही एक भाग आहे.

डिजिटल प्रशासन बदलत असताना नागरिकांना प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या घटकांची भूमिकाही बदलत आहे. त्यामुळे क्षमता उभारणी केवळ एखादे पोर्टल कसे वापरायचे किंवा नवीन सेवा कशी द्यायची याच्या प्रशिक्षणापुरती मर्यादित राहू शकत नाही. नागरिकांशी प्रभावी संवाद, नागरिकाभिमुख दृष्टिकोन, डिजिटल जबाबदारी, समुदाय सहभाग, समस्या ओळखण्याची क्षमता आणि सातत्याने शिकण्याची वृत्ती यांनाही आता तितकेच महत्त्व आहे.

महाआयटीचा क्षमता उभारणी कक्ष या उपक्रमाचा समन्वय करणार आहे. व्हीएलईंचे नेटवर्क, जिल्हास्तरीय अंमलबजावणी, क्षमता विकास प्रक्रिया आणि प्रायोगिक उपक्रमातून मिळणारे अनुभव यांची सांगड घालण्याची भूमिका हा कक्ष पार पाडेल. या प्रक्रियेतून मिळणारे क्षेत्रीय अनुभव महाआयटीच्या व्यापक क्षमता उभारणी प्रयत्नांसाठीही उपयुक्त ठरू शकतील.

डिजिटल प्रशासनाची गुणवत्ता नागरिकाला त्याच्या दैनंदिन जीवनात शासन व्यवस्था कशी अनुभवायला मिळते, यावर ठरत असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

व्हीएलईंकडे केवळ डिजिटल सेवा देणारा परिचालक म्हणून न पाहता नागरिकांना मदत करणारा, विश्वासार्ह आणि सक्षम स्थानिक दुवा म्हणून त्याची क्षमता विकसित करणे हा या भागीदारीचा केंद्रबिंदू आहे. नाशिक आणि हिंगोलीतील हा प्रायोगिक उपक्रम, हा दृष्टिकोन प्रत्यक्षात तपासण्याची, तसेच व्हीएलई आणि नागरिकांच्या अनुभवांतून शिकण्याची संधी देणारा आहे.



## योगदान:

**मजकूर योगदान:**
धीरेंद्र सिंग

**संपादन:**
माधुरी पांगे

**तपशील समन्वय, संकलन आणि यशोगाथा:**
प्रज्योत आयरे आणि जिल्हास्तरीय सहकारी
रवींद्र गांगुर्डे
पृथ्वीराज हणमंतराव बिरादार

**रचना, सजावट:**
हर्षवर्धन बगाडे
सूर्यकांत उभे

**योगदान:**
माधुरी पांगे
सुभाष शेळके
नरेश इंगळे
मुकेश शर्मा


**आम्हाला फॉलो करा**

@MahaIT
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
आपले सरकार


**प्रकाशक**

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

अपीजे हाऊस, तिसरा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के. सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र 400020

**ई-मेल:** editor@mahait.org
**संकेतस्थळ:** https://mahait.org